महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

● संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ६, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार ७ मे २०२४ ते सोमवार १३ मे २०२४ ● POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 ● RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## महाजनांवर मोक्का लावायचा, भाजपला घाबरवायचे आणि २५ आमदार फोडायचे, ठाकरेंचा होता प्लॅन, CM शिंदे यांचा गौप्यस्फोट



**चार-पाच लोकांना जेलमध्ये डांबण्याचा त्यांचा प्लॅन झाला होता, त्याच्यामध्ये तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस पण होते, मला स्वतः त्यांनी सांगितले, देवेंद्र फडणवीस व त्यांच्या कुटुंबीयांबाबत माझ्याकडे माहिती आली आहे. आता देवेंद्रना सोडत नाही, त्यांना जेलमध्येच घालतो, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी ठाण्यातील महायुतीच्या मेळाव्यात केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता मुख्यमंत्री शिंदे यांनी ही घणाघाती टीका केली. यावेळी राज ठाकरे, आनंद दिघे, शिवसेना-भाजप युती, राजन विचारे यांच्याबाबत शिंदे यांनी धक्कादायक खुलासे केले.**

■ मुंबई: विशाल पाटील

ठाणे लोकसभेतील महायुतीचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवारी नरेश म्हस्के यांच्या प्रचारार्थ टिप-टॉप प्लाझा येथे मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबोधित केले. भाजप नेते गिरीश महाजन यांच्यावर मोक्का लावला जाणार होता, मी म्हटलं, असं करणे योग्य नाही, तर ते म्हणाले मला करायचे आहे, भाजपला घाबरवायचे आहे, त्यांच्या लोकांना जेलमध्ये टाकायचे, आणि भाजपचे २० ते २५ आमदार फोडायचे, असा त्यांचा पूर्णपणे प्लॅन होता. मात्र हा प्लॅन यशस्वी झाला, तर माझा प्लॅन अयशस्वी झाला असता, असा दावा शिंदे यांनी याप्रसंगी करत सत्तांतराबाबत मोठा खुलासा केला.

देव आपल्या पाठीशी असतो, त्यांना अवदसा आठवली, त्यांनी शिवसेनेच्या वर्धापनदिनात भाजपबाबत चुकीची भाषा वापरली. त्यानंतर मला विधानपरिषद आणि राज्यसभा प्रक्रियेतून बाहेर काढले, तुम्ही मला ओळखले नाही. हे मी पत्नीला सांगितले, तेव्हा ती म्हणाली की बाळासाहेब ठाकरे यांचा मुलगा असून त्याला तुम्हाला ओळखता आले नाही, असे शिंदे यांनी सांगितले. भाजपच्या लोकांना आत टाकून पक्ष संपवायचा आणि मलाही संपवायचा असा डाव त्यांचा होता, अशी घणाघाती टीका शिंदे यांनी ठाकरे यांच्यावर केली. मी त्यांच्या मंत्रिमंडळात होतो. (शेष पृष्ठ २ वर)

## संक्षिप्त

### सुट्टीत मतदारराजाची गावाकडे धाव, निवडणूक प्रचार आणि मतटक्का वाढवण्याचे सर्वपक्षीयांपुढे आव्हान

■ मुंबईः नितीन देवळेकर

शहर, उपनगरांत लोकसभा निवडणुकीचा प्रचार रंगात आला असताना मतदारांची मात्र गावी जाण्यासाठी लगबग सुरू आहे. कोकणात उन्हाळी सुट्टीत गावी जाणाऱ्यांची संख्या यंदाही मोठी आहे. मुंबईत, सोमवारी २० मे रोजी मतदान आहे. मात्र, शनिवार (१८ मे) ते सोमवारदरम्यान (२०) मुंबई-कोकण मार्गावरील



सर्वच विशेष आणि नियमित गाड्या आरक्षित झाल्या असून, प्रतीक्षायादी सरासरी शंभरपार पोहोचली आहे. त्यामुळे निवडणूक प्रचार आणि मतटक्का वाढविण्याचे मोठे आव्हान उमेदवारांसह पक्षांपुढे आहे. मुंबईत लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात सोमवार, २० मे रोजी मतदान होणार आहे. उमेदवारांच्या हातात जेमतेम १५ दिवस आहेत. या कालावधीत संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढण्यासाठी पदयात्रा, मेळावे, बैठका, रॅली यांचे नियोजन करताना उमेदवार घामाघूम होत आहेत. ज्यांच्यासाठी उमेदवारांचा हा अट्टाहास सुरू आहे त्या मतदारराजाची मात्र गावाकडे रिघ लागली आहे.

### मुंबईकरांवर पाणीकपातीचं संकट! मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांत १७ टक्केच साठा शिल्लक

■ मुंबईः रघुवीर जाधव

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांमध्ये गेल्या वर्षीच्या २३ टक्के पाणीसाठ्याच्या तुलनेत यंदा फक्त १७ टक्के साठा उरला आहे. त्यामुळे तूर्त पाणीकपातीचा मुंबई महापालिकेचा विचार नसला तरी मेअखेरीस पाणीसाठ्याचा



आढावा घेऊन याबाबत निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती मुंबई महापालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, विहार, तुळशी आणि राज्य सरकारच्या अप्पर वैतरणा, भातसा या सात तलावांतून मुंबईला पाणीपुरवठा होतो. या तलावांची पाणी साठवण क्षमता १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर आहे. या तलावांतून दररोज ३ हजार ८५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो. वाढलेला उकाडा पाण्याची वाढती मागणी आणि तलावांतील पाण्याचे होणारे बाष्पीभवन यांमुळे तलावांतील पाणीपातळी कमी होत आहे.

## अब की बार ४०० पार! भाजपवर घोषणा बाजूला ठेवण्याची वेळ; कारण ठरताहेत मित्रपक्ष

■ मुंबई: विशाल कारंडे

देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. तिसऱ्या टप्प्यातला प्रचार काल थांबला. राज्यात उद्या ११ जागांवर मतदान होईल. यातील बहुतांश जागा पश्चिम महाराष्ट्रातील आहे. साखर पट्ट्यात कोणाच्या तोंडात साखर पडणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. या पट्ट्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद आहे. कोल्हापूर, हातकणंगलेत शिंदेसेनेचे उमेदवार आहेत. राज्यात भाजप पहिल्यांदाच २८ जागांवर लढत आहे. पण मित्रपक्षांमुळे भाजपची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजपवर 'अब की बार ४०० पार'ची घोषणा बाजूला



ठेवण्याची वेळ आली आहे. देशभरातील मित्रपक्ष भाजपची डोकेदुखी वाढवत आहे. भाजपप्रणित एनडीएमध्ये ४० पक्ष आहेत. ते १०० जागांवर लढत आहेत. मात्र त्यांची कामगिरी समाधानकारक नसल्याचं भाजप नेतृत्त्वाला वाटतं. राज्यात लोकसभेच्या एकूण ४८ जागा आहेत. पैकी २० जागा मित्रपक्ष लढवत आहेत. शिंदेसेना १५, अजित पवारांची राष्ट्रवादी ४, तर राष्ट्रीय समाज पक्ष १ जागेवर लढत आहे. गेल्या निवडणुकीत शिवसेना, भाजप युतीनं ४१ जागा जिंकल्या होत्या. (शेष पृष्ठ २ वर)

## जीवघेणा रेल्वे प्रवास; सर्वाधिक महसूल गोळा करणाऱ्या रेल्वेला प्रवाशांच्या जीवाचे मोल शून्य

■ ठाणे: तृप्ती गोरे

ठाणे रेल्वे स्टेशनच्या पल्याडचा प्रवास दिवसेंदिवस धोकादायक होत चालला आहे. खचाखच भरलेल्या लोकल आणि दरवाजाच्या बाहेर लोंबकळत असलेले रेल्वे प्रवासी असे चित्र आता नेहमीचे झाले आहे. रेल्वेच्या गर्दीने सात दिवसांत तीन बळी घेतले आहेत. मात्र प्रचारात गुंग असलेल्या राजकीय नेत्यांना याचे काहीच सोयरसुतक नसून लोकलमधील गर्दी आता अधिकच जीवघेणी होत चालली असल्याने रेल्वे प्रवास देखील धोकादायक झाल्याचे चित्र पहावयास





मिळत आहे.ठाणे शहराच्या पुढील असलेल्या शहरांचा अवाका वाढत चालला असून बदलापूर-अंबरनाथनंतर आता थेट कर्जत-कसारापर्यंत शहरांचा विस्तार होत चालला आहे. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात नवीन शहरांची निर्मिती होत असून बदलापूर, कसारा, अंबरनाथ, कल्याण, डोंबिवली, मुंब्रा, दिवा या परिसरात नागरीकरणाचा वेग प्रचंड आहे. स्वस्त आणि मस्त घरे मिळत असल्याने या परिसरात घरे घेण्याला सर्वाधिक पसंती मिळत आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## विजय करंजकरांना शिंदेंकडून मोठी जबाबदारी, ठाकरे गटाकडून करंजकरांचा खरपूस समाचार; म्हणाले...

■ नाशिक: सचिन कदम

नाशिक लोकसभा मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाकडून विजय करंजकर यांना उमेदवारी दिली जाईल, अशी चर्चा होती. विजय करंजकर यांच्याकडून नाशिक लोकसभेसाठी तयारीही केली जात होती. मात्र ऐनवेळी विजय करंजकर यांचा पत्ता करत सिन्नर माजी आमदार राजाभाऊ वाजे यांना ठाकरे गटाकडून उमेदवारी जाहीर केली. यामुळे विजय करंजकर नाराज होते. या नाराजीमुळे विजय करंजकर यांनी बंडखोरी करत नाशिक लोकसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज देखील दाखल केला. यावेळी माझ्या सोबत भगूर, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, नाशिकमधील २७ ते ३० नगरसेवक तसेच जिल्हा परिषद, पंचायत समितीचे सदस्य असल्याचा दावा करत त्यांनी ठाकरे गटाला इशारा दिला होता. यानंतर विजय करंजकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे, उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख भाऊसाहेब चौधरी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये शिंदे गटात प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विजय करंजकर यांच्यावर मोठी जबाबदारी



सोपवली आहे. त्यांना उपनेते पद तसेच नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख पद देण्यात आले आहे. विजय करंजकर हे शिंदे गटात सामील झाल्याने शिवसेना शिंदे गटाचे नाशिकचे उमेदवार हेमंत गोडसे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## 'या निवडणुकांनंतर महाराष्ट्रात दोन पक्ष लोप पावतील', पृथ्वीराज चव्हाणांचा मोठा दावा; म्हणाले, 'या पक्षांमधली माणसं...'

■ मुंबई: माधव अलवा

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी येत्या ७ मे रोजी मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील ११ जागांवरील प्रचाराच्या तोफा रविवारी संध्याकाळी थंडावल्या. या प्रचारकाळात महाविकास आघाडी व महायुती या राज्यातील दोन्ही आघाड्यांकडून एकमेकांवर टीका-टिप्पणी, टोलेबाजी, कोपरखळ्या, टोमणे असं सगळं मतदारांना पाहायला मिळालं. मात्र, एकीकडे मतदानाच्या आधीच्या या घडामोडी




घडत असताना दुसरीकडे निवडणुकीनंतर महाराष्ट्रातले दोन पक्ष दिसणार नाहीत, असं मोठं विधान माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केलं आहे. महाराष्ट्रात एकूण पाच टप्प्यांमध्ये लोकसभेच्या ४८ जागांसाठी मतदान पार पडणार आहे. त्यातील पहिल्या दोन टप्प्यांसाठी मतदान झालं असून ७ मे, १३ मे आणि २० मे या तीन दिवशी अनुक्रमे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या टप्प्यासाठी मतदान होणार आहे. (शेष पृष्ठ २ वर)


## 'मुंबईत मराठी माणसाला नोकरी नाकारली, गुजरातधार्जिण्या नेत्यांमुळेच हा माज वाढतोय'

■ मुंबई: संजीनी खाडे

देशाची आर्थिक अन् महाराष्ट्राची राजधानी मुंबईत मराठी माणसाला घर नाकारणे, दुकानावर मराठी पाट्या न लावणे, मराठी न बोलणे हे प्रकार असताना आता मुंबईतच मराठी माणसाला नोकरी नाकारण्याचे धाडस कंपन्या करु लागल्या आहेत. ITCODE Infotech या कंपनीने चक्क मराठी लोकांनी अर्ज करु नयेत अशी जाहिरात करण्याचे धाडस केले. भाजपाचे सरकार आल्यापासून असा मराठीद्वेष उफाळून आला आहे, अशा मुजोर कंपन्यांवर कठोर कारवाई करण्याची हिम्मत भाजपा-शिंदे सरकारने दाखवावी अन्यथा रस्त्यावर उतरून जाब विचारा लागेल, असा इशारा मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी दिला आहे. (शेष पृष्ठ २ वर)








# अमेठी, रायबरेलीचा वारसा

अमेठीतून राहुल आणि रायबरेलीतून प्रियांका गांधींनी लढावे यासाठी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जणू आंदोलन छेडले होते. काँग्रेस 'खुल जा सिमसिम' म्हणत जादूचा पेटारा उघडेल, असे वाटत होते. प्रत्यक्षात तसे काहीच झाले नाही. प्रियांका यांना इंदिरा गांधींच्या रूपात पाहणाऱ्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचीही घोर निराशा झाली आहे. अमेठी आणि रायबरेली हे दोन्ही मतदारसंघ गांधी परिवाराचे पारंपरिक आहेत. २०१९ च्या तुलनेत या वेळी काँग्रेसला 'अच्छे दिन' आल्याचे दिसत असल्याने अमेठीतून राहुल आणि रायबरेलीतून प्रियंका गांधींनी लढावे यासाठी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जणू आंदोलन छेडले होते. काँग्रेसनेही या जागांची उमेदवारी रहस्यमय ठेवली.

उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख शुक्रवारी होती. काँग्रेस 'खुल जा सिमसिम' म्हणत जादूचा पेटारा उघडतील असे वाटत होते. प्रत्यक्षात तसे काहीच झाले नाही. अगदी शेवटच्या क्षणी काँग्रेसने नावे जाहीर केली.

त्यानंतर राहुल गांधी आणि प्रियांकावर टीकेची झोड उठायला लागली. राहुल गांधी यांनी अमेठी सोडली म्हणून विरोधकांच्या हाती आयते कोलीत मिळाले. प्रियांकाला इंदिरा गांधींच्या रूपात पाहणाऱ्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचीही घोर निराशा झाली आहे. अमेठीतून २०१४ मध्ये लाखावर मताधिक्याने राहुल गांधी यांनी भाजपच्या स्मृती इराणींचा पराभव केला होता. तत्पूर्वी २००४ पासून याच मतदारसंघातून सातत्याने दोन ते तीन लाखांच्या मताधिक्याने ते निवडणूक जिंकत गेलेत. १९९९ मध्ये सोनिया गांधी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत होत्या. गांधी कुटुंबातील संजय गांधी आणि




राजीव गांधी खासदार होते. पराभव झाल्यानंतरही स्मृती इराणी पाच वर्षे अमेठीच्या संपर्कात होत्या. नंतर त्यांनी २०१९ मध्ये राहुल गांधींचा पराभव केला. मात्र, गेल्या पाच वर्षातील या मतदारसंघातील चित्र बदलले आहे. स्मृती इराणींचे लोकांशी वागणे, पत्रकारांना धमक्या देणे, मंत्रिपदाची बाधा होणे यामुळे मतदार त्यांच्यावर काहीसे नाराज आहेत. अमेठीत राहुल गांधी पुन्हा परततील, अशी अपेक्षा होती. परंतु रायबरेलीला पसंती दिल्याने त्यांना अमेठीतून जिंकण्याची खात्री नव्हती का?


असे प्रश्न उपस्थित होत आहेत. गेले चार दशके अमेठीशी संपर्कात असलेले काँग्रेसचे आणि गांधी घराण्याचे एकनिष्ठ किशोरीलाल शर्मा यांना अमेठीतून उमेदवारी देण्यात आली आहे. इराणीबाईसमोर ते आव्हान उभे करतील यात वाद नसला तरी राहुल गांधी यांनी मतदारसंघ का सोडला, हा चर्चेचा विषय झाला आहे. तब्बल २५ वर्षात प्रथम अमेठीच्या मैदानात गांधी घराणे नसणार आहे. प्रियांका गांधी यांच्याकडे पाहून अनेकांना इंदिरा गांधी यांची आठवण येते. प्रियांकाच्या भाषणापासून तर पेहरावापर्यंत त्यांची तुलना इंदिराजींशी केली जाते. चेहरा कुटुंबातून मिळू शकतो. परंतु कर्तृत्व स्वतः सिद्ध करावे लागते. इंदिरा गांधींनी अवघ्या ४२ व्या वर्षी काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले होते. आज प्रियांका गांधी ५२ वर्षांच्या आहेत. काँग्रेसच्या महासचिव म्हणून त्यांचा विशेष प्रभाव दिसला नाही. विधानसभा निवडणुकीत उत्तरप्रदेशची जबाबदारी त्यांच्याकडे होती. त्यांच्या सभेला प्रचंड गर्दी होत असे. त्यांनी संपूर्ण उत्तरप्रदेश पिंजून काढला. मात्र, काँग्रेसला केवळ २.३३ टक्के मते मिळाली. भाजपच्या डावपेचांपुढे काँग्रेस खुजी पडत गेल्याचे दिसले. परिश्रम करूनही यश न आल्याने नैराश्य येणे स्वाभाविक आहे. परंतु प्रियांका यांनी निवडणूकच लढायची नाही हा निर्णय गांधी कुटुंबावर प्रेम करणाऱ्या लोकांना खूपसा आवडलेला दिसत नाही. उत्तरप्रदेशातील तेव्हाचे आणि आताचे चित्र खूप वेगळे आहे. लोकांना महागाईचे तडाखे बसताहेत आणि रोजगारासाठी वणवण फिरावे लागत आहे. लोकांना धार्मिक ध्रुवीकरण नकोसे झाले आहे. त्यामुळेच प्रियांका गांधी यांनी अमेठी किंवा रायबरेलीमधून निवडणूक लढणे गरजेचे होते, असे काँग्रेसचे लोक मत व्यक्त करतात. इंदिरा गांधी प्रतिकूल परिस्थितीतही खंबीर असत. प्रियांकाची भूमिका तशीच असावी, असे अनेकांना वाटते. १९६४ मध्ये पंडित नेहरूंचे निधन झाल्यानंतर लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. त्यावेळी इंदिरा गांधी खासदारसुद्धा नव्हत्या. लालबहादूर शास्त्री यांनी त्यांना माहिती व नभोवाणी मंत्री केले. त्या राज्यसभेवर निवडून आल्या. दुर्दैवाने १९६६ मध्ये शास्त्रीजींचे निधन झाले. यानंतर काँग्रेसमध्ये पंतप्रधानपदासाठी चढाओढ सुरू झाली. मोरारजी देसाई, जगजीवनराम, के. कामराज, गुलजारीलाल नंदासारखे दिग्गज काँग्रेसमध्ये होते. इंदिराजींनी काँग्रेसचे अध्यक्ष के. कामराज यांना विश्वासात घेतले व संसदीय मंडळात पंतप्रधानपदाचा उमेदवार ठरावा, अशी गळ घातली. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत मोरारजी देसाईंचा इंदिरा गांधींनी पराभव केला व पंतप्रधानपद मिळविले.

# जगातील पहिल्या एक्सरेचा शोध अपघाताने कसा लागला?


एक्स रे किरणांचे आजच्या मेडिकल सायन्समधील महत्व कुणीही नाकारू शकणार नाही. एक्स रेचा उपयोग शरीराच्या आतल्या भागातील बिघाड शोधण्यासाठी केला जातो हे तर सर्वांना माहीत आहे. पण एक्स







रेचा उपयोग कॅन्सरसारख्या आजार शोधण्यासाठी देखील केला जातो. तसे एक्स रेचे अनेक उपयोग आहेत. पण आज आम्ही तुम्हाला एक्स रेचे फायदे नाही, तर या एक्स रेच्या शोधामागील गोष्ट सांगणार आहोत. एक्स रेचा शोध हा विल्यम रोन्टजेन यांनी सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी १८९५ साली लावला होता. एक्स रेचा अर्थ होतो अज्ञात किरणे. या किरणांना रोन्टजेन किरणे पण म्हटले जाते. याच शोधासाठी रोन्टजेन यांना १९०१ साली भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार देखील दिला गेला होता. या एक्स रेच्या शोधामागची गोष्टदेखील भन्नाट आहे. रोन्टजेन आपल्या लॅबमध्ये कॅथोड रे ट्यूबमध्ये काहीतरी परीक्षण करत होते. त्यांनी पडदे टाकून लॅबमध्ये अंधार केला होता आणि ट्युब काळ्या रंगाच्या डब्ब्याने झाकून ठेवली होती. रोन्टजेन यांना त्यावेळी दिसले की ट्युबजवळ ठेवलेल्या काही बेरीयम प्लॅटिनो सायनाईडच्या तुकडयांमधून एक प्रकारचा प्रकाश झगमगत होता. रोन्टजेन यांनी आजूबाजूला बघितले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की त्यांच्या टेबलपासून काही फूट दूर एक पडदाही चमकत आहे. रोन्टजेन यांना आता हे सगळे बघून प्रचंड आश्चर्य वाटत होते. कारण ट्यूब तर काळ्या डब्ब्याने झाकली होती आणि कॅथोड किरणे बाहेर निघण्याचा कुठलाही मार्ग नव्हता. हे बघून त्यांना कळून चुकले की ट्यूबमधून काही अज्ञात किरणे निघत आहेत आणि ही किरणे जाड कागदामधून देखील परावर्तीत होऊ शकत आहेत. त्याकाळी या किरणांचे विशेष ज्ञान नसल्याने त्यांना रोन्टजेन यांनी एक्स किरणे म्हटले. आता त्यांनी या किरणांवर प्रयोग करायला सुरुवात केली. त्यांना समजले की ही किरणे कागद, रबर त्याचप्रमाणे धातूंच्याही आरपार जातात. आता रोन्टजेन यांना एक वेगळी गोष्ट सुचली. त्यांनी विचार केला की, जसे साधारण फोटो मधून फिल्म प्रभावित होते, तसेच या किरणांचा प्रभाव फोटो फिल्मवर देखील पडू शकण्याची शक्यता आहे. त्यांनी फक्त या कल्पनेत न रमता तसा प्रयोगही लवकरच अंमलात आणला. रोन्टजेन यांनी एक फोटो फिल्म डेव्हलप केली. त्यांना आता दिसून आले की, प्लेटवर हाताचे हाड स्पष्टपणे दिसत आहे. तसेच त्यांच्या चारी बाजूला अंधारल्यासारखे त्यांना दिसले. त्यांनी पुन्हा त्यांच्या पत्नीवरही हा प्रयोग करून बघितला. एखाद्या जिवंत व्यक्तीचा हा पहिलाच एक्स रे होता. या एक्स रेत त्यांच्या पत्नीची बोटे तसेच हातातली अंगठी देखील त्यांना स्पष्टपणे दिसली. बऱ्याच शोधांमध्ये त्या शोधाचे साईड इफेक्ट्स सुरवातीच्या काळात लक्षात येत नाहीत. इथेही असेच झाले. याच




एक्स रे किरणांच्या अतिवापरामुळे रोन्टजेन यांना जीव गमवावा लागला आणि ही किरणे किंवा किरणशलाका मानवी शरीरासाठी अपायकारक आहेत हे सिद्ध झाले. तर, अशी होती एक्सरेच्या जन्माची कथा. अपघाताने लागलेला शोध ते शोधकर्त्याचाच जीव घेण्यापर्यंत हा प्रवास आहे. या संशोधनाने वैद्यकशास्त्राला नवीन दिशा दिली हे मात्र नक्की.

# विज्ञानाला आव्हान देणारी, आजही न उलगडलेली रहस्ये!

जगभरातील उत्साही आणि सगळ्या रहस्यांचा पर्दाफाश करण्याचा ध्यास घेतलेले लोक सतत कुठल्या ना कुठल्या शोधमोहिमेवर जाऊन जगातील रहस्यांचा उलगडा करण्याचा प्रयत्न करीत असतात.

आपला भारत सुद्धा अनेक अद्भुत लोक, जागा आणि गोष्टी बाळगून आहे. ह्या अद्भुत गोष्टींवर जगभरातल्या अनेक वैज्ञानिकांनी प्रयोग केले, अभ्यास केला, निरीक्षणे केली. पण त्यांनाही ह्या रहस्यांचा उलगडा करणे जमले नाही. आधुनिक



विज्ञानाने सुद्धा ह्या रहस्यांपुढे गुडघे टेकले आहेत. आज आपण अशाच काही रहस्यांबद्दल जाणून घेणार आहोत. आज आपण अशाच काही रहस्यांबद्दल जाणून घेणार आहोत.

**१) प्रल्हाद भाई मगनलाल जानी:** एक निरोगी साधू, जे काहीही न खाता व्यवस्थित आरोग्य राखून आहेत. कदाचित ह्या व्यक्तीबद्दल तुम्हाला माहित असेल. जगातल्या अनेक लोकांनी ह्यांच्यावर रिसर्च केला आहे. हे प्रल्हादभाई काहीही खात नाहीत. काहीही नाही म्हणजे काहीच नाही. अन्नाचा एक कण सुद्धा नाही.

जेव्हा दुसरं महायुद्ध संपत आलं होतं तेव्हा तेव्हा त्यांनी शेवटचं खाल्लं होतं. त्यानंतर त्यांनी अन्नाचा एकही कण पोटात घेतला नाही. त्यांचा जन्म १९२९ मध्ये झाला असून वयाच्या सातव्या वर्षी त्यांनी संन्यास घेण्यासाठी घर सोडले. २००३ साली डॉक्टरांनी १० दिवस त्यांचे निरीक्षण केले पण १० दिवसांनंतर सुद्धा आश्चर्य वाटले की रोज फक्त १०० मिली पाणी घेऊन सुद्धा प्रल्हाद भाईंच्या सर्व शारीरिक क्रिया व्यवस्थित सुरु होत्या आणि आजही आहेत. त्यांच्या ह्या Super natural शक्तीचे रहस्य आजवर कोणालाही कळू शकले नाही.

**२) प्रकाश उत्सर्जक घातक शक्ती – उत्तर प्रदेश:** उत्तर प्रदेश हे राज्य दाट लोकसंख्येसाठी प्रसिद्ध आहे. २००२ साली ह्या राज्याच्या काही भागात एका प्रकाश उत्सर्जक वस्तुमुळे अनेक लोकांना शारीरिक इजा झाली होती आणि ७ लोक ठार झाले होते. अनेक लोकांच्या चेहऱ्यावर व हातांवर ओरखडे उमटल्याच्या खुणा होत्या. पण आजवर कोणालाही कळू शकले नाही की हवेत उडणारी ती विचित्र वस्तु म्हणजे नेमकं काय होतं! काही लोक म्हणतात की ती वस्तू म्हणजे aliens चे UFO होते. तर काही म्हणतात की ते शत्रू राष्ट्राचे विमान होते. IIT – कानपुरच्या संशोधकांचे असे निदान आहे की वातावरणात झालेल्या अनियमित बदलांमुळे हिरव्या व निळ्या रंगाची ऊर्जा/ प्रकाश उत्सर्जित झाली. पण हे परत का झाले नाही? हे एक न उलगडलेले कोडेच आहे.

**३) Kongka- La : भारत चीन बॉर्डर वरचा UFO base?:** भारत व चीन च्या थ्ध्ण च्या क्षेत्रात Kongka La pass म्हणून एक जागा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तिथे अनेक विचित्र, अनाकलनीय आकृतींचे दर्शन झाले आहे. कधी हवेत उडत्या तबकड्या, कधी alien प्राणी, तर कधी एखादे UFO!

जेव्हा भारतीय सैन्याला असे काही दिसले तेव्हा सुरुवातीला त्यांना ते चीनचे विमान किंवा ड्रोन आहे असे वाटले. पण अनेक वर्षात तिथे संशोधनासाठी गेलेल्या लोकांना आणि स्थानिकांना विचित्र अद्भुत गोष्टींचा अनुभव आला आहे. इतकेच नव्हे, ह्याच गोष्टींचा चीनला सुद्धा अनुभव आला आहे. जेव्हा जेव्हा त्यांना असे काही दिसते, तेव्हा तेव्हा ते तिथला सैन्याचा बेस कॅम्प हलवतात. अमरनाथच्या यात्रेला गेलेल्यांना सुद्धा काही वर्षांपूर्वी त्या भागात aliens असल्याचे जाणवले होते. आसपासचे टुरिस्ट गाईड सांगतात की तिथे एक UFO base आहे.

**४) जयगडच्या किल्ल्यामधील रहस्यमयी खजिना:** राजा अकबर हा त्याच्या उदार धार्मिकनीतीसाठी प्रसिद्ध होता. परंतु त्याच्या काही अधिकाऱ्यांना हे मान्य नव्हते. त्यांनी राजा विरुद्ध कट कारस्थान रचले.

पण राजाला हे कळल्यावर त्याने त्याच्या निष्ठावान राजा मानसिंहाला सोबत घेऊन ह्या कारस्थान्यांचा पाडाव केला आणि मानसिंह राजाला काबूलचा गव्हर्नर केले. मानसिंहाने



तेथे अनेक वर्ष राज्य केले आणि एक शहर वसवले जे आज आपण जयपूर म्हणून ओळखतो. असे म्हणतात की राजा मानसिंहाने राजा अकबरापासून लपवून जयगड किल्ल्यात विहिरी खोदून त्यात अनेक जड जवाहिर व संपत्ती लपवून ठेवली होती. अनेक वर्षांनंतर आणीबाणीच्या काळात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी ह्या खजिन्यासाठी शोधमोहीम सुरु करण्याचा विचार केला.

जेव्हा हे पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान जुल्फिकार अली भुट्टो ह्यांना कळले, तेव्हा त्यांनी ह्या खजिन्यावर पाकिस्तानचाही हक्क आहे असा दावा केला. त्यांनी पत्रात असे नमूद केले फाळणीपूर्वीच्या प्रत्येक संपत्तीवर पाकिस्तानचाही हक्क आहे. तर जयगडमध्ये काही संपत्ती सापडल्यास पाकिस्तानचाही एक भाग देण्यात यावा. ह्यावर इंदिरा गांधींनी बराच काळ काहीही उत्तर पाठवले नाही. भारत सरकारचे म्हणणे आहे की जयगड किल्यात काहीही सापडले नाही. पण त्यानंतर ३ दिवस सेनेला मार्ग देण्यासाठी दिल्ली-जयपूर हायवे बंद करण्यात आला होता. खरंच जयगड किल्ल्यात काही सापडले की नाही हे आजवर रहस्यच आहे.

**५) छत्तीसगढमधील अद्भुत रॉक पेंटिंग:** काही महिन्यांपूर्वी छत्तीसगढच्या चमारा ह्या भागातील



काही गुहांमध्ये १०००० वर्षांपूर्वीचे रॉक पेंटिंग्स सापडले. त्यात त्या काळातले प्राणी, जनावरे, त्यांचे राहणीमान, जनजीवन ह्या विषयी अनेक चित्रं आहेत. पण सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे एका चित्रामध्ये alien च्या UFO चे चित्र होते. ह्यात एका चित्रात aliens माणसांना किडनॅप करून नेताना दाखवले आहे. आजूबाजूच्या गावात राहणारी माणसे सांगतात की alien दर महिन्याला माणसांना त्यांच्या UFO मध्ये किडनॅप करून नेत असत आणि ती माणसे कधीच परत येत नसत.

**६) ज्वालाजी मंदिर – अखंड ज्योत:** हिमाचल प्रदेशाच्या कांगडा जिल्ह्यामध्ये ज्वालाजी मंदिर स्थित आहे. हे मंदिर धरमशाला पासून ५५ किमी लांब आहे. ह्या मंदिरात कधीच न विझणारी ज्योत आहे जिला भक्त ज्वालाजी म्हणून मानतात आणि पूजा करतात. ह्या मागे एक रंजक कहाणी आहे. भगवान शंकर आणि सती ह्यांचा विवाह सतीचे वडील प्रजापती दक्ष ह्यांना मान्य नव्हता. एकदा जेव्हा दक्षाने मोठा यज्ञ करायचे ठरवले तेव्हा सर्वांना आमंत्रण दिले परंतु सती व शिवाला आमंत्रण दिले नाही. तरीही सती त्या स्थळी गेली पण दक्षाने शिवाचा अपमान केला.



हे सहन न झाल्याने सतीने क्रोधाने यज्ञकुंडात उडी घेतली. हे पाहून व्यथित आणि क्रोधीत होऊन भगवान शंकरांनी सतीचा देह घेऊन तांडव सुरु केले. विश्वाचा विनाश होणार ह्या भीतीने भगवान विष्णू ह्यांनी आपल्या सुदर्शन चक्राने सतीच्या देहाचे ५१ तुकडे केले. ते देहाचे भाग पृथ्वीवर जिथे पडले तिथे शक्तिपीठे आहेत अशी धारणा आहे.

तर ह्या ठिकाणी सतीची जिव्हा म्हणजेच जीभ पडली व तिथेच ज्वालाजी मंदिर बांधले अशी आख्यायिका आहे. मुघल शासक अकबराने त्याच्या राज्यात ही ज्योत विझवण्याचे अनेक विफल प्रयत्न केले. आजही पुजारी न घाबरता ह्या ज्योतीमध्ये हात घालून तो दर्शनाला येणाऱ्या भक्ताच्या डोक्याला लावतात. पण त्यांचा हात भाजत नाही. ह्या ज्योतीच्या स्रोताबद्दल अनेक वेळा रिसर्च केले आहे परंतु कोणालाही तिचा उगम स्रोत सापडला नाही हे विशेष. आजही ज्वालाजी मंदिर हे रहस्यमय म्हणून ओळखले जाते. असं म्हणतात जिथे विज्ञान उत्तर देऊ शकत नाही तिथे supreme power म्हणजेच देवाचा चमत्कार हेच उत्तर असते...

पान १ वरुन...

## महाजनांवर मोक्का लावायचा,...

तरीही माझे एका प्रकरणात खोटे नाव गोवण्याचा प्रयत्न करत कारस्थान रचण्यात आले, कसा राहणार एकनाथ शिंदे, असाही सवाल करत शिंदे यांनी स्वतःवर झालेल्या अन्यायाबाबत भाष्य केले. शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांनी एकनाथ शिंदे यांची सभागृह नेतेपदी नेमणूक केल्याची आठवण सांगताना तत्कालीन सभागृह नेते राजन विचारे यांनी स्वतःहून येऊन मला ते पद देऊ केले, हा प्रसंग 'धर्मवीर' सिनेमात आम्ही दाखवले, ते खोटे होते, दुसऱ्या भागात आम्ही खरे दाखवणार आहे. कारण विचारे यांना आनंद दिघे यांनी राजीनामा देण्यासाठी सांगितले होते, मात्र त्यांनी दिला नाही, असा दावा करत शिंदे यांनी आम्ही सिनेमात उलटे दाखवले.

## अब की बार ४००...

याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. त्यासाठी मिशन ४५ आखण्यात आलं आहे. पण बहुतांश सर्व्हे पाहता महायुतीला ४० पेक्षा जास्त जागा जिंकताना दिसत नाही. महायुतीला २८ ते ३० जागा मिळताना दिसत आहेत. भाजपची कामगिरी चांगली असेल, असं सर्व्हे सांगतात. पण मित्रपक्षांना फारसं यश मिळणार नाही, असे अंदाज आहेत. त्यामुळे भाजपची धाकधूक वाढली आहे.

## जीवघेणा रेल्वे प्रवास;...

या पट्ट्यात नोकरदार वर्गाचा टक्का वाढत असून टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी हजारो चाकरमानी सकाळ उजाडताच मुंबई, ठाणे, नवी मुंबईच्या दिशेने धाव घेतात यांना रेल्वे वाहतुकीशिवाय स्वस्त आणि जलद पर्याय उपलब्ध नसल्याने लोकलमध्ये धक्के खात, लोंबकळत जसा मिळेल तसा प्रवास करून घर अथवा कार्यालय गाठण्यासाठी रोज लढाई करावी लागते. दोन दिवसांपूर्वी डोंबिवलीत राहणाऱ्या तरुणीचा लोकलमधून प्रवास करताना तोल जाऊन पडून मृत्यू झाला. रिया राजगोरे ही तरुणी डोंबिवलीहून लोकलने मुंबईला कामाला निघाली होती. नेहमीप्रमाणे ती डोंबिवली रेल्वे स्थानकातून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या लोकलमध्ये चढली. मात्र लोकलमध्ये गर्दी असल्याने रियाने दरवाज्याजवळ उभे राहून प्रवास केला. कोपर ते दिवा रेल्वे स्थानकादरम्यान रियाचा तोल जाऊन ती खाली पडली, त्यात तिचा मृत्यू झाला.

लाखो रेल्वे प्रवासी दरवर्षी रेल्वेला करोडो रुपयांचा महसूल मिळून देतात, मात्र त्यांचा जीवाचे मोल शून्य आहे. मागील दोन वर्षात तीसपेक्षा जास्त रेल्वे प्रवाशांचा रेल्वेतून खाली पडून मृत्यू झाले आहेत. तरीही रेल्वे प्रशासनाला त्यांच्या मृत्यूचे गांभीर्य नाही. ठाणे पल्याड रेल्वे प्रवाशांना दिलासा देण्यासाठी ठाणे ते दिवा रेल्वे स्थानकादरम्यान पाचवी आणि सहावी रेल्वे मार्गिका टाकण्यात आली, मात्र त्याचा फायदा रेल्वे प्रवाशांना झाल्याचे अजूनतरी बघण्यात नाही.

## विजय करंजकरांना...

दरम्यान, विजय करंजकर यांना एकनाथ शिंदे यांनी जिल्हा संपर्कप्रमुख पदाची जबाबदारी सोपवताच शिवसेना ठाकरे गटाने करंजकर यांचा खरपूस समाचार घेतला आहे. करंजकरांच्या प्रवेशामागे बारगेनिंग झाल्याचा आरोप ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी केला आहे. तर करंजकर पक्षातून गेल्याचा आनंद झाला आहे. आम्हाला त्यांचा त्रासच होत होता, असे ठाकरे गटाच्या माजी नगरसेवकांनी म्हटले आहे. विजय करंजकर पक्षातून गेल्याने कुठलाही फटका बसणार नाही. आमचा विजय निश्चित आहे, असा दावा नाशिकचे ठाकरे गटाचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांनी केला आहे. दरम्यान नाशिक लोकसभेच्या निवडणुकीत कोण बाजी मारणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'या निवडणुकांनंतर महाराष्ट्रात...

४ जून रोजी देशभरातील सर्व जागांची मतमोजणी होईल. मात्र, त्यानंतर दोन पक्ष लोप पावतील, असं चव्हाण यांनी म्हटल्यामुळे तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे. हे दोन पक्ष नेमके कोणते? याबाबत त्यांनी भाष्य केलं नसलं, तरी त्यावरून अंदाज बांधले जात आहेत.

## 'मुंबईत मराठी माणसाला...

दरम्यान, मुंबईत असलेल्या कंपनीकडून मराठी माणसाला नोकरी नाकारल्यानंतर विरोधी पक्षातील नेत्यांनी तीव्र शब्दात संताप व्यक्त केला आहे. खासदार संजय राऊत, आमदार रोहित पवार यांनीही मुंबईत मराठा माणसांच्या हक्कावर गदा आणली जात आहे क, असा सवाल उपस्थित केला आहे. त्यानंतर, यासंदर्भात प्रतिक्रिया देताना प्रा. वर्षा गायकवाड यांनीही संताप व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले की, घ्ऊण्ध्र्‍ घ्र्द्रिम्प् ही कंपनी सुरतची आहे. गिरगावातील कार्यालयासाठी या कंपनीने ग्राफिक डिझायनर पदासाठी जाहिरात दिली पण मराठी उमेदवारांनी अर्ज करू नये, असे त्यात स्पष्ट म्हटले. मराठीबहुल वस्ती असलेल्या गिरगावातच मराठी माणसाला नोकरी देणार नाही, असा उद्दामपणा ही कंपनी करु शकली. कारण राज्यातील सत्ताधारी भाजपा व शिंदे सरकार गुजरातचे हस्तक आहेत. मोदी-शाह व गुजरात विरोधात ठाम भूमिका घेण्याची धमक त्यांच्यात नाही. परंतु, हा मुजोरपणा व मराठी स्वाभिमानाला कोणी ठेच पोहचवत असेल तर ते सहन केले जाणार नाही, असा इशाराच वर्षा गायकवाड यांनी दिला आहे. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला गेले, या प्रश्नावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'गुजरात राज्य काही पाकिस्तान नाही', असे बेजबाबदार व निर्लज्ज उत्तर दिले होते. अशा या बोटचेप्या व गुजराती धार्जिण नेत्यांमुळेच माज वाढत चालला आहे.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# भाडेपट्ट्यात सवलत न दिल्याने म्हाडावासीयांवर आर्थिक बोजा!

**मुंबई: सम्यक कासारे**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वसाहतींचा भाडेपट्टा शीघ्रगणकाशी (रेडी रेकनर) जोडल्यानंतर झालेली वाढ कमी न केल्यामुळे म्हाडावासीयांना भविष्यात लाखो रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे. भाडेपट्ट्याबाबत नवे धोरण जाहीर झाल्यानंतर म्हाडावासीयांनी जोरदार विरोध केला होता. तरीही म्हाडाने भाडेपट्ट्याच्या धोरणात बदल केलेला नसल्याचे दिसून येते. अभिहस्तांतरणाच्या (कन्व्हेयन्स) माध्यमातून मालकी हक्क देणाऱ्या म्हाडाकडून भाडेपट्टा आकारणी म्हणजे लूट असल्याची प्रतिक्रिया रहिवाशांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र म्हाडाकडे आता भूखंड शिल्लक नसल्यामुळे भाडेपट्ट्यातून मिळणारा महसूल हीच कमाई असल्याचा दावा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याने केला. शहर आणि उपनगरात म्हाडाच्या ११४ अभिन्याआत (लेआऊट) दोन कोटी १९ लाख १८ हजार ९४ चौरस मीटर इतका भूखंड येतो. या भूखंडावरील काही इमारतींशी ३० वर्षांचा तर काहींशी ९९ वर्षांचा भाडेपट्टा करार म्हाडाने केला आहे. या बहुसंख्य इमारतींच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करण्यासाठी म्हाडाने नवे धोरण आणले आहे. या धोरणानुसार, एकूण भूखंडाच्या २५ टक्के क्षेत्रफळावर प्रचलित शीघ्रगणकानुसार येणाऱ्या रकमेवर अडीच टक्के असा भाडेपट्ट्याचा दर आहे. याशिवाय दर पाच वर्षांनंतर प्रचलित शीघ्रगणकानुसार भाडेपट्टा आकारणे तसेच भाडेपट्टा हा सुरुवातीला ३० वर्षांपर्यंतच मर्यादित आणि त्यानंतर ३०-३० वर्षे असे ९०/९९ वर्षांपर्यंत नूतनीकरण करण्यात यावे असे धोरण म्हाडाने निश्चित केले आहे. मात्र विविध प्रकारच्या १३ दंडात्मक तरतुदींमध्ये केलेली ५५ ते ७५ टक्के वाढ आता १० ते ५० टक्क्यांपर्यंत मर्यादीत केली आहे. भाडेपट्टा नूतनीकरणासाठी म्हाडाने विविध ठराव केले होते. मात्र भाडेपट्टा नूतनीकरणाबाबत धोरण निश्चित केलेले नव्हते. त्यामुळे ज्या इमारतींच्या भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण करण्याची पाळी आली, तेव्हा याबाबत धोरण निश्चित होईल तेव्हा फरकाची रक्कम भरण्याचे हमीपत्र २००५ मध्ये केलेल्या ठरावानुसार संबंधित इमारतींकडून घेण्यात आले. हे धोरण ऑगस्ट २०२१ मध्ये निश्चित करण्यात आले. त्यामुळे नूतनीकरणासाठी आलेल्या इमारतींना शीघ्रगणकाच्या दरानुसार भाडेपट्टा भरण्यास म्हाडाने सांगितले. ही रक्कम काही लाखो रुपयांच्या घरात गेल्यामुळे गृहनिर्माण संस्था अस्वस्थ झाल्या. पूर्वी हा भाडेपट्टा शीघ्रगणकाशी जोडलेला नव्हता. त्यामुळे फारच अल्प भाडेपट्टा भरावा लागत होता. याबाबत ओरड झाल्यानंतर या धोरणाचा फेरविचार करण्याचे आश्वासन म्हाडाने दिले. परंतु फेब्रुवारी महिन्यात झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत मागील धोरण निश्चित करण्यात येऊन सवलतीस नकार देण्यात आला.




म्हाडाने अभिहस्तांतरणाच्या माध्यमातून घराची मालकी दिली आहे. मात्र इमारतीखालील भूखंडावर आजही म्हाडाचा अधिकार आहे. त्यामुळे त्यांना भाडेपट्टा घेण्याचा अधिकार आहे.

## मद्यविक्रीचा बंदीचा आदेश हा मतदान काळ आणि मतदारसंघापुरता मर्यादित, उच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती

**मुंबई: माधव अलवा**

मद्यविक्रीचा बंदीचा आदेश मतदान काळ आणि मतदारसंघापुरता मर्यादित असल्याचे उच्च न्यायालयाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. तसेच, याबाबत रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या आदेशात सुधारणा केली आहे.

रायगड जिल्ह्यात रायगड आणि मावळ हे दोनच लोकसभा मतदारसंघ असून दोन्हींसाठी अनक्रमे ७ व १३ मे रोजी मतदान होणार आहे. ही बाब लक्षात घेता कायद्याने दोन्ही मतदारसंघात केवळ मतदानाच्या ४८ तासांच्या आधी आणि मतदान संपेपर्यंत मद्यविक्रीला बदी घालता येऊ शकते. दोन्ही मतदारसंघात वेगवेगळ्या दिवशी मतदान होणार असल्याने जिल्हाधिकारी संपूर्ण जिल्ह्यासाठी ही अट लागू करू शकत नाहीत, असेही न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या नवी मुंबई हॉटेल ओनर्स असोसिएशनच्या याचिकेवर निर्णय देताना खंडपीठाने



उपरोक्त आदेश दिले. मावळ लोकसभा मतदारसंघात पनवेल, कर्जत आणि उरण या विधानसभा मतदारसंघाचा, तर रायगड लोकसभा मतदारसंघात पेण, अलिबाग, श्रीवर्धन आणि महाड या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. परंतु, लोकप्रतिनिधी कायद्याच्या संबंधित कलमाला बगल देऊन रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण जिल्ह्यात मतदान काळात मद्यविक्रीवर बंदी घालणारा आदेश काढला आहे. औरंगाबाद खंडपीठाने यासंदर्भात दिलेल्या आदेशाचा दाखला याचिकाकर्त्यांनी आदेशात सुधारणा करण्याची मागणी करताना दिला होता.

दुसरीकडे, लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम १४२ नुसार जिल्हाधिकाऱ्यांना मद्यविक्रीवर बंदी घालण्याचे अधिकार असून त्यात हस्तक्षेप करता येऊ शकत नाही, असा दावा सरकारी वकिलांनी याचिकाकर्त्यांच्या याचिकेला विरोध करताना केला. तथापि, कायद्यानुसार बंदीचा आदेश हा केवळ मतदान क्षेत्रापुरता मर्यादित असून त्यापलीकडे तो लागू केला जाऊ शकत नाही. त्यामुळे, जिल्हाधिकाऱ्यांना मद्यविक्री बंदीचे आदेश लागू करण्याचा अधिकार असला तरी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या अधिकाराला मर्यादा आहेत, असे न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिलासा देताना नमूद केले. शिवाय, मद्यविक्री बंदीचा आदेश हा केवळ मतदान काळापुरता मर्यादित असून त्यानंतर तो लागू होऊ शकत नाही, या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशाकडेही न्यायालयाने लक्ष वेधले. तसेच, रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण रायगड जिल्ह्यासाठी लागू केलेल्या मद्यविक्रीच्या आदेशात सुधारणा केली. न्यायालयाच्या सुधारित आदेशानुसार, रायगड लोकसभा मतदारसंघासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश हा ४ मे रोजी सायंकाळी ५ वाजल्यापासून ७ मे रोजी मतदान पूर्ण होईपर्यंत लागू असेल.

## ठाकरे गटाला प्रचारात समाजवादी पक्षाचे बळ

**मुंबई: रघुवीर जाधव**

शिवसेना आणि समाजवादी पक्षात मुंबईत कायमच विळ्या-भोपळ्याचे संबंध राहिले आहेत. 'सपा'चे सर्वेसर्वा मुलायमसिंह यादव यांचा शिवसेनेकडून कायम 'मुल्ला मुलायम' असा उल्लेख केलाय जायचा. पण बदलत्या राजकीय समीकरणात शिवसेना आणि समाजवादी पक्ष आता एकत्र आले आहेत. यातून दक्षिण मुंबई मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार अरविंद सावंत यांच्या प्रचारार्थ समाजवादी पार्टीचे मुस्लीम कार्यकर्ते रविवारी भायखळ्यात सहभागी झाले होते. तसेच शिवसेना शाखेतही बैठकीला उपस्थित होते. महाविकास आघाडीचे घटक पक्ष म्हणून समाजवादी पक्षाने शिवसेना ठाकरे गटाच्या प्रचारात भाग घेतला आहे. दक्षिण मुंबईत मुस्लीम मतदारांची संख्या लक्षणीय आहे. आमदार रईस शेख यांनी शुक्रवारी भायखळा येथील शिवसेना शाखा क्रमांक २१२ ला भेट दिली. यावेळी त्यांनी शिवसेना उमेदवार




अरविंद सावंत यांच्या लोकसभा निवडणूक प्रचारार्थ शिवसैनिकांशी संवाद साधला. भेटीदरम्यान शाखा प्रमुख विनोद शिर्के यांच्यासह शेकडो शिवसैनिक उपस्थित होते. यासंदर्भात रईस शेख म्हणाले की, मी कार्यकर्त्यांसह भायखळा येथील शिवसेना शाखेला भेट दिली. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी प्रचाराशी संबंधित संवाद साधला. सावंत यांच्या प्रचारात आम्ही पूर्ण शक्तीनिशी उतरलो आहोत. समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते सावंत यांच्या प्रचारासाठी दक्षिण मुंबईत रस्त्यावर उतरतील. शिवसेना आणि मुस्लीम धर्मीयांमध्ये पूर्वापार वैमनस्य होते. राजकीय गणिते आता बदलली आहेत. शिवसेना आणि मुस्लीम धर्मीय एकत्र येणे शहराच्या राजकारणातली आश्चर्यकारक घटना असून हा बदल इतिहास घडवेल, असा दावा त्यांनी केला. या भेटीवर ठाकरे गटाचे भायखळा शाखा २१२ चे शाखाप्रमुख विनोद शिर्के यांनी सांगितले की, समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते आणि मुस्लीम धर्मीय यांच्या पाठिंब्याने आम्ही भारावून गेलो आहोत.

## वैद्यकीय विद्यार्थ्यांना आता महाविद्यालय बदलता येणार नाही, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाची नवी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर

**मुंबई: राकेश गायकवाड**

एखादे चांगले महाविद्यालय मिळावे, वैद्यकीय कारण, एकल पालक किंवा काही ठराविक कारणासाठी वैद्यकीय विद्यार्थ्यांना एमबीबीएसच्या प्रथम वर्षानंतर महाविद्यालय बदलण्याची संधी देणारा नियम राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने रद्द केला आहे. यापुढे कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्यांना एका महाविद्यालयातून दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घेणे शक्य होणार नाही. यामुळे विद्यार्थी व पालकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या जुन्या नियमानुसार एमबीबीएसची प्रथम वर्ष परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर



त्यांना वैद्यकीय महाविद्यालय बदलण्याची परवानगी देण्यात येत होती. मात्र वैद्यकीय परिस्थिती, एकल पालकत्त्व आणि विनंती केलेल्या वैद्यकीय महाविद्यालयातील जागांची उपलब्धता लक्षात घेऊन, तसेच अन्य वैध कारणांसह राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग वैद्यकीय विद्यार्थ्यांना दुसऱ्या महाविद्यालयात स्थलांतरित होण्यास परवानगी देत होते. यासाठी प्रत्येक महाविद्यालयाला ५ टक्के जागांपर्यंत परवानगी दिली होती. मात्र शैक्षणिक वर्ष सुरू असताना महाविद्यालय बदलण्यास पूर्वीच्या नियमातही परवानगी देण्यात येत नव्हती. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या पदवी वैद्यकीय शिक्षण मंडळाने (यूजीएमईबी) नियमांमध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार वैद्यकीय संस्थेमध्ये प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव विद्यार्थी यापुढे अन्य कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकणार नाही. प्रवेशासंदर्भातील नव्या नियमाबाबत विद्यार्थी व पालकांनी निराशा व्यक्त केली आहे. या नियमामुळे विद्यार्थ्यांना एखाद्या चांगल्या वैद्यकीय महाविद्यालयात जागा रिक्त असल्यास, त्या वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण घेण्याची संधी हिरावली जाणार आहे.

## वाहतुकीचे नियम मोडल्याप्रकरणी दोन हजार वाहनचालकांवर कारवाई, मुंबई पोलिसांच्या 'ऑल आऊट' मोहिमेतून कारवाईचा बडगा

**मुंबई: यश सावंत**

मुंबई पोलिसांनी ३, ४ मेदरम्यान शहर आणि उपनगरांमध्ये ऑल आऊट मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. दरम्यान, १११ ठिकाणी लावण्यात आलेल्या नाकाबंदीतून ६,२३३ वाहनांची तपासणी करण्यात आली. वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविणाऱ्या २,४४० वाहनचालकांविरोधात कारवाई करण्यात आली. ड्रंक अँड ड्राईव्ह प्रकरणात ७७ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.या कारवाईदरम्यान फरार असलेल्या आठ आरोपींतांच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले. एकूण ५३ अजामीनपात्र वॉरंट काढून आरोपींवर कारवाई करण्यात आली. तसेच, अंमली पदार्थांची खरेदी – विक्री करणाऱ्या इसमांविरोधात ५ कारवाया करण्यात आल्या. त्याचबरोबर अवैध शस्त्रे बाळगल्याप्रकरणी ४९ कारवाया करून तलवार, चाकू आदी शस्त्रे जप्त करण्यात आली. अवैध दारू विक्री, जुगार चालविणाऱ्या २४ ठिकाणी छापे टाकून अवैध धंदे उद्ध्वस्त



करण्यात आले. यातून ३० आरोपीतांना अटक करण्यात आली. तडीपार, तसेच शहरात विनापरवाना प्रवेश केलेल्या तडीपार आरोपींना अटक करण्याच्या अनुशंगाने ६२ कारवाया करण्यात आल्या. संशयितरित्या वावरणाऱ्या इसमांवर १७५, तर अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात १५४ कारवाया करण्यात आल्या. संपूर्ण शहरात राबविलेल्या या मोहिमेत ९६४ आरोपींच्या तपासणीतून २३० आरोपींवर कारवाई करण्यात आली. तसेच, ८०० हॉटेल, लॉज, मुसाफिरखाने आदींची तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर, एकूण ५२९ संवेदनशील ठिकाणांचीही तपासणी करण्यात आली.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एसटीच्या नऊ हजार बस धावणार, महामंडळाच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांची भर

**मुंबई: प्रथमेश चव्हाण**

देशात सात टप्प्यांत, तर महाराष्ट्रात पाच टप्प्यांत लोकसभा निवडणूक होत आहे. या पार्श्वभूमीवर मतदानाचे यंत्र, साहित्य व मतदान



पथकांना मतदान केंद्रापर्यंत नेऊन सोडण्याचे आणि निवडणूक मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर त्यांना परत घेऊन आणण्याची जबाबदारी राज्य परिवहन (एसटी) महामंडळावर सोपविण्यात आली आहे. यासाठी एसटी बसचे आरक्षण करण्यात आले असून, राज्यातील पाच टप्प्यांतील मतदानासाठी सुमारे नऊ हजार एसटी बस धावत आहेत.

एसटी महामंडळाला प्रत्येक बसमागे २४ ते ३० हजार रुपये मिळणार आहेत. दोन टप्पे झालेत. आता राज्यात तिसरा टप्पा हा ७ मे रोजी होणार असून यात ११ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. राज्यात मतदानाचा चौथा टप्पा १३ मे रोजी पार पडणार आहे.

पाचव्या टप्प्यात २० मे रोजी एकूण १३ मतदारसंघांत मतदान होत असून, मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघासाठी १२७ बसचे आरक्षण करण्यात येणार आहे.

## विधान भवन, नया नगर, मरोळमधील भूखंडांचा एमएमआरसी विकास करणार, जूनमध्ये निविदा प्रसिद्ध करणार

**मुंबई: नितीन देवळेकर**

मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (एमएमआरसी) 'कुलाबा – वांद्रे – सिप्झ मेट्रो ३' प्रकल्पाची उभारणी करीत असून या मार्गिकेच्या उभारणीसाठी आलेला खर्च भरून काढण्यासाठी एमएमआरसीने या प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध झालेल्या भूखंडांचा विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार विधान भवन, नया नगर आणि मरोळ येथील तीन भूखंडांच्या विकासासाठी जूनमध्ये निविदा काढण्यात येणार आहेत.

एमएमआरसी ३३.५ किमी लांबीच्या भुयारी 'मेट्रो ३' मार्गिकेचे काम युद्धपातळीवर करीत आहे. या प्रकल्पासाठीचा २३ हजार कोटी रुपये खर्च ३३ हजार कोटी रुपयांवर आणि नंतर ३७ हजार कोटी रुपयांवर गेला आहे. जायकाकडून कर्ज घेऊन या प्रकल्पासाठी कोट्यवधी रुपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे. प्रकल्पाचा खर्च तिकीट विक्री वा इतर पर्यायाद्वारे वसूल होणे शक्य नाही. त्यामुळे या मार्गिकेच्या कामासाठी राज्य सरकारकडून घेतलेल्या काही भूखंडांचा विकास करण्याची मागणी एमएमआरसीकडून करण्यात आली होती. या मागणीनुसार विधान भवन, नया नगर आणि मरोळमधील भूखंड




एमएमआरसीला उपलब्ध करण्यात आले आहेत. माहीम, नया नगरमधील भूखंड ३८६५ चौरस मीटर क्षेत्रफळाचा, विधान भवन मेट्रो स्थानकानजीकचा भूखंड १.६८ हेक्टर इतका आहे. तर मरोळमधील भूखंडही एमएमआरसीला उपलब्ध झाला आहे. या भूखंडांवर निवासी वा व्यावसायिक संकुले उभे करून त्यातून महसूल मिळविण्याचा एमएमआरसीचा प्रयत्न आहे. या तिन्ही भूखंडांच्या विकासासाठी निविदा प्रसिद्ध करण्याची तयारी सुरू आहे. आचार संहिता संपुष्टात आल्यानंतर अर्थात जूनमध्ये प्रत्यक्षात निविदा प्रसिद्ध केल्या जातील, अशी माहिती एमएमआरसीमधील उच्चपदस्थ अधिकाऱ्याने दिली. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या जागांचा शक्य तितक्या लवकर विकास करून यातून जास्तीतजास्त महसूल मिळविण्याचा एमएमआरसीचा प्रयत्न आहे. दरम्यान, महसुलात वाढ व्हावी यासाठी 'मेट्रो ३' मार्गिकेवरील स्थानकांतील जागांचा कसा वापर करता येईल याचा अभ्यास करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. या सल्लागाराच्या नियुक्तीसाठीही निविदा काढण्यात येणार आहे.

## कोळीवाडे आणि गावठाणातील रहिवाशांनीही दिला आपला जाहीरनामा, कोळीवाड्यामध्ये झोपू योजना नको

**मुंबई: माधव अलवा**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर विविध रहिवासी संघटना आपल्या मागण्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध करत आहेत. कोळीवाडे आणि गावठाणांमध्ये राहणाऱ्या रहिवाशांनीही आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला



आहे. कोळीवाड्यांचे आणि गावठाणांचे सीमांकन करावे, कोळीवाड्यांसाठी स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली आणावी, कोळीवाड्यांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना नको अशा मागण्यांचा यात समावेश करण्यात आला आहे.

मुंबई ४१ कोळीवाडे आणि ८८ गावठाणे आहेत. हे कोळीवाडे म्हणजे जुन्या मुंबईची ओळख आहे. या कोळीवाड्यांचे प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून तसेच आहेत. दरवेळी राजकीय पक्षांतर्फे या कोळीवाड्यांच्या विकासासाठी सीमांकन करण्याचे, विकास नियंत्रण नियमावली आणण्याचे आश्वासन दिले जाते. मात्र ही आश्वासने पूर्ण होत नाहीत. त्यामुळे आता मुंबईतील कोळीवाड्यांसाठी एक जाहीरनामा तयार करण्यात आला आहे. वॉचडॉग फाऊंडेशन या सामाजिक संस्थेचे पिमेंटा गॉडफ्रे यांनी सांगितले की, या जाहीरनाम्यात कोळीवाड्यांच्या सीमांकनाची मागणी करण्यात आली आहे. मुंबईचा विकास आराखडा तयार होऊन दहा वर्षे झाली तरी अद्याप कोळीवाड्यांसाठी स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली आलेली नाही. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत चटईक्षेत्रफळ निर्देशांक ४ पर्यंत दिला जातो. तोच कोळीवाड्यांमध्ये जेमतेम दीड एफएसआय दिला जातो. त्यामुळे येथील घरांचा पुनर्विकास होऊ शकत नाही. गावठाणांच्या विकासासाठीचा निधी झोपडपट्ट्यांमध्ये वापरला जातो, असाही आरोप पिमेंटा यांनी केला आहे.

## दीड वर्षात निवासी डॉक्टरांवर नऊ वेळा हल्ले, सुरक्षा व्यवस्था भक्कम करण्यासाठी 'मार्ड'चे राज्य सरकारला पत्र

**मुंबई: विशाल कारंडे**

गेल्या दीड वर्षामध्ये राज्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये नऊ वेळा निवासी डॉक्टरांवर हल्ले करण्यात आले असून या घटनांमुळे रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यातच अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयामध्ये निवासी डॉक्टरांवर झालेल्या हल्ल्यामुळे चिंता व्यक्त होऊ लागली आहे. या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील निवासी डॉक्टरांना पुरविण्यात येणारी सुरक्षा व्यवस्था अधिक भक्कम करण्यात यावी, अशी मागणी करणारे पत्र केंद्रीय मार्डने राज्य सरकारला पाठवले आहे. अकोला येथील ३ मे २०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात शस्त्रक्रिया करणाऱ्या निवासी डॉक्टरांवर रुग्णांच्या नातेवाईकांकडून हल्ला केला. राज्यातील आठ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वर्षभरामध्ये रुग्णांच्या नातेवाईकांनी हल्ले केले आहेत. डॉक्टर, वैद्यकीय विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्यावर हल्ले होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत



आहे. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेबद्दल चिंता व्यक्त करण्यात येत आहे. मागील वर्षी जानेवारीमध्ये यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टरांवर हल्ला करण्यात आला होता. त्यानंतर चंद्रपूरमध्ये मे आणि सप्टेंबरमध्ये दोन वेळा हल्ले झाले. डिसेंबर २०२३ मध्ये पिंपरी येथील वैद्यकीय महाविद्यालयात, २९ जानेवारी २०२४ मध्ये पुन्हा चंद्रपूरमध्ये, ४ मार्च २०२४ रोजी पिंपरी वैद्यकीय महाविद्यालयात, १९ एप्रिल २०२४ मध्ये अकोला येथे, २१ एप्रिल २०२४ रोजी संभाजी नगर आणि ३ मे २०२४ रोजी अकोला वैद्यकीय महाविद्यालयात निवासी डॉक्टरांवर हल्ला करण्यात आला होता. जानेवारी २०२३ पासून आतापर्यंत निवासी डॉक्टरांवर तब्बल नऊ वेळा हल्ले करण्यात आले आहेत.

निवासी डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्यांचा परिणाम डॉक्टरांच्या शैक्षणिक प्रगतीवरही होत असतो. हे वातावरण डॉक्टरांच्या विकासासाठी घातक असते. परिणामी, भविष्यात डॉक्टरांना सुरक्षित वातावरणात शिक्षण मिळावे यासाठी त्यांना पुरेशी सुरक्षा व्यवस्था पुरविणे आवश्यक आहेत.

# महाराष्ट्र देशातील असंतोषाचा जनक ; उद्धव ठाकरे यांचा भाजप, मोदींवर हल्लाबोल

■ **नवी मुंबई: धनश्री सट्टा**

'भ्रष्टाचारी तितुका मेळवावा, भाजप पक्ष वाढवावा', असे सध्या देशभर सुरू आहे. शुरा मी वंदिले ऐवजी, चोर आम्ही वंदिले हा भाजपचा नारा आहे. आज देशभरात मोदी आणि भाजपविरोधात जो असंतोष भडकला आहे त्या असंतोषाचा जनकही महाराष्ट्र असल्याची घणाघाती टीका उद्धव ठाकरे यांनी केली. ठाणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार राजन विचारे यांच्या ऐरोली येथील प्रचारसभेत ते बोलत होते. "वाढती महागाई, बेरोजगारीबाबत तुम्ही चकार शब्द काढणार नाही आणि धर्माधर्मात द्वेष वाढविण्याचे, मारामाऱ्या घडवून आणण्याचे उद्योग करणारष्ठ तुमचा पराभव झाला तर पाकिस्तानात का जल्लोष होईल? खरा जल्लोष तर भारतातच होईल," असा टोला ठाकरे यांनी लगावला. 'भारतीय असंतोषाचे जनक' लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचा संदर्भ ठाकरे यांनी आपल्या भाषणात दिला. स्वातंत्र्याच्या आधी संपूर्ण देश प्रवाहप्रतीत झाला होता. कुणीही इंग्रजांच्या विरोधात बोलायला तयार नव्हते. तेव्हा महाराष्ट्राच्या सुपुत्राने 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच' असे भर कोर्टात ठणकावून सांगितले होते. त्या लोकमान्यांनासुद्धा अभिमान वाटत असेल की



तो माझा महाराष्ट्र आजसुद्धा जागा आहे. आज देशभरात मोदी आणि भाजपविरोधात भडकलेल्या असंतोषाचा जनकही महाराष्ट्रच आहे, असा दावा उद्धव ठाकरेंनी केला.

महाविकास आघाडीच्या सभांना अलोट गर्दी असते. लोक चिडले आहेत व मतदानाच्या तारखेची वाट पाहात आहे. शिवसैनिकांना विकत घेण्याचा प्रयत्न होतोय. जे विकत घेतले जात नाहीत त्यांना तुरुंगात टाकले जाते, असा आरोप ठाकरे यांनी केला. मोदी एका मुलाखतीत म्हणाले मला उद्धव यांच्याविषयी प्रेम आहे. भाजपने २०१४ साली मोदींचे नाव पंतप्रधानपदासाठी निश्चित केले तेव्हा पक्षाचे तत्कालीन अध्यक्ष राजनाथ सिंह यांनी मला मत विचारले होते. तेव्हा तुमच्या नावाला पाठिंबा देण्याचे पाप मी केले, अशा शब्दांत उद्धव यांनी टीका केली. पुलवामा हल्ला झाला तेव्हा मोदी जीम कॉर्बेटमधील जंगलात फोटोग्राफी करत होते. जम्मू-काश्मीरचे तत्कालीन राज्यपाल सत्यपाल मलिकांनी मोदींचे ढोंग उघड केले. त्यावर मोदी अजूनही बोलत नाहीत. गुजरातला देताना महाराष्ट्राचा घास तुम्ही काढून घेत आहात. महाराष्ट्राच्या गल्लीबोळात सभा घ्या. ४०० पेक्षा अधिक सभा घेऊन महाराष्ट्राला हरवून दाखवाच, असे आव्हान यावेळी त्यांनी दिले.

## कल्याण लोकसभा क्षेत्रात उद्धव ठाकरेंना पुन्हा धक्का; उपजिल्हाप्रमुख प्रकाश म्हात्रे, माजी नगरसेविका प्रेमा म्हात्रेंचा शिंदेच्या सेनेत प्रवेश

■ **ठाणे: तृप्ती गोरे**

कल्याण लोकसभा मतदार संघामध्ये निवडणुकीच्या तोंडावर पक्षांतराचे वारे गेल्या काही दिवसांपासून जोरदार वाहू लागले असून उबाठा गटाचे कल्याण ग्रामीणमधील उपजिल्हाप्रमुख प्रकाश म्हात्रे आणि माजी नगरसेविका प्रेमा प्रकाश म्हात्रे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी शिवसेनेत प्रवेश केला. या पक्षप्रवेशाच्या माध्यमातून शिंदेंनी पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांना धक्का दिल्याचे चित्र आहे.



शिवसेनेतील बंडानंतर ठाणे जिल्ह्यातील अनेक आमदार, नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साथ दिली तर, काही पदाधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबतच राहणे पसंत केले. परंतु लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा दिवस जसा जवळ येऊ लागला आहे, तसा उद्धव ठाकरे यांच्या गटातील पदाधिकारी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करताना दिसू लागले आहेत. मुख्यमंत्री पुत्र व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मतदार संघात अशीच काहीसे चित्र आहे. चार दिवसांपुर्वी डोंबिवलीतील उबाठा गटाचे शहर प्रमुख विवेक खामकर, महिला जिल्हा संघटक कविता गावंड यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदेच्या सेनेत प्रवेश केला. त्यापाठोपाठ आता उबाठा गटाचे कल्याण ग्रामीणमधील उपजिल्हाप्रमुख प्रकाश म्हात्रे आणि माजी नगरसेविका प्रेमा प्रकाश म्हात्रे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्यासह केशव पाटील, शाखाप्रमुख परेश पाटील, उमेश सुर्वे, अशोक पाटील, विजय पाटील आणि अन्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या पक्ष प्रवेशाच्या माध्यमातून शिंदेच्या सेनेकडून उद्धव ठाकरे यांना पुन्हा एकदा धक्का देण्यात आल्याचे बोलले जात आहे. उबाठा गटाकडून आपल्याला विश्वासात घेतले गेले नाही, आणि आपला भ्रमनिरास झाला आहे. गेल्या १० वर्षात कल्याण लोकसभेत विकासाची गंगा आली असून आपण आता विकासापासून अलिप्त राहू शकत नाही.

## बहुजन विकास आघाडीला अखेर शिट्टी चिन्ह मिळाले, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

■ **वसई: प्रतिनिधी**

पालघर लोकसभा मतदारसंघातील प्रमुख दावेदार असलेल्या बहुजन विकास आघाडीने आपली पारंपरिक



शिट्टी निशाणी कायम ठेवण्यात यश मिळवले आहे. पक्षाचे उमेदवार राजेश पाटील आता शिट्टी चिन्हावर प्रचार करणार आहे. शिट्टी मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पसरला असून यामुळे विजय सोप्पा होणार असल्याचा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. बहुजन विकास आघाडीची वसई विरार महापालिकेत निर्विवाद सत्ता असते. शिट्टी ही निशाणी या पक्षाचे पारंपरिक चिन्ह. सर्व निवडणुका या शिट्टी चिन्हावर लढविण्यात येत होत्या. त्यामुळे शिट्टीवाले अशी ओळख होती. परंतु मागील निवडणुकीत एका स्थानिक पक्षाच्या माध्यमातून शिट्टी चिन्ह पळविण्यात आले होते. त्यामुळे यंदा शिट्टी चिन्ह वाचविण्यासाठी पक्षाने प्रयत्न केले. अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी राजेश पाटील यांनी अर्ज दाखल केला होता. सोमवारी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर उमेदवारांना चिन्हाचे वाटप करण्यात आले आणि बहुजन विकास आघाडीला शिट्टी चिन्ह मिळाले. यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पसरला आहे. शिट्टी चिन्हामुळे आमचा विजय आता अधिक सोपा झाला आहे. कार्यकर्ते उत्साहात आणि जोमाने कामाला लागले आहेत, अशी प्रतिक्रिया पक्षाचे संघटक सचिव अजीव पाटील यांनी दिली.

# ठाणे जिल्ह्यात १११ पैकी ९१ अर्ज ठरले वैध

■ **ठाणे: तृप्ती गोरे**

जिल्ह्यातील ठाणे, कल्याण आणि भिवंडी या तिन्ही मतदारसंघासाठी एकूण ३५५ अर्जांचे वितरण करण्यात आले होते. यापैकी १११ उमेदवारांनी १३६ अर्ज भरले होते. शनिवारी झालेल्या छाननीमध्ये १११ उमेदवारांपैकी ९१ उमेदवारांचे अर्ज वैध तर, २० उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत. यामुळे भिवंडीत सर्वाधिक ३६, कल्याणमध्ये ३० आणि ठाण्यामध्ये २५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून यापैकी कोणते उमेदवार माघार घेणार की, इतकेच उमेदवार रिंगणात असणार, हे चित्र सोमवारी स्पष्ट होईल. ठाणे जिल्ह्यात ठाणे, कल्याण आणि भिवंडी असे तीन लोकसभा मतदारसंघ आहेत. या तिन्ही मतदारसंघात महायुती, महाविकास आघाडीसह विविध पक्षांसह अपक्ष इच्छुक उमदेवारांनी अर्ज भरले आहेत. या तिन्ही मतदारसंघात २६ एप्रिलपासून




उमेदवारी अर्ज वितरीत आणि दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली. काही उमेदवारांनी दोन ते तीन अर्ज दाखल केले होते. यामुळे ३ तारेखपर्यंत तिन्ही मतदारसंघांमध्ये १११ उमेदवारांचे एवूण १३६ अर्ज दाखल झाले आहेत. या अर्जाची शनिवारी छाननी करण्यात आली. यामध्ये २० अर्ज बाद झाले आहेत तर, ९१ अर्ज वैध ठरले आहेत. ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी १०५ उमेदवारी अर्ज वितरीत करण्यात आले होते. यापैकी ३६ उमेदवारांनी ४३ अर्ज दाखल केले होते. अर्ज छाननी प्रक्रियेत ३६ पैकी २५ अर्ज वैध तर, ११ अर्ज अवैध ठरले. कल्याण लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक १३७ उमेदवारी अर्ज वितरीत करण्यात आले होते. त्यापैकी ३४ उमदेवारांनी ४५ उमेदवारी अर्ज भरले होते. अर्ज छाननी प्रक्रियेत ३४ पैकी ३० अर्ज वैध तर, ४ अर्ज अवैध ठरले. भिवंडी लोकसभा मतदारसंघात ११३ उमेदवारी अर्ज वितरीत करण्यात आले होते.

## अतिरिक्त फीसाठी निकाल राखीव, उरणमध्ये पालक संघटनेची शाळेविरोधात पोलिसांत धाव

■ **उरण: सतिश सोनावणे**

येथील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित युईएस शाळा व्यवस्थापनाने ओळखपत्र, डायरी, ई-लर्निंगची अतिरिक्त फी न भरणाऱ्या विद्यार्थ्यांचे निकाल देण्यास नकार दिला.



यामुळे संतप्त झालेल्या पालक संघटनेचे पदाधिकारी, पालक, विद्यार्थ्यांनी शाळा व्यवस्थापनाविरोधात गुन्हा नोंद करण्यासाठी पोलीस ठाण्यात धाव घेतली. राज्यभर बुधवारी महाराष्ट्र दिनाची धामधूम असतानाच उरणमध्ये मात्र पालक- विद्यार्थ्यांना न्यायासाठी पोलिसांत धाव घ्यावी लागल्याने शाळा व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराविरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला. उरण एज्युकेशन सोसायटीची विद्यार्थ्यांकडून ओळखपत्राच्या नावाखाली ५५०, डायरी-१००, ई-लर्निंग-१२०० अशी अतिरिक्त शुल्काची रक्कम शाळा व्यवस्थापनाकडून वसूल करीत असल्याचा आक्षेप घेत पालक-शिक्षक संघटनेचे पदाधिकारी यांनी विरोध केला आहे. या संदर्भात उरण पंचायत समितीच्या शिक्षण विभागानेही २९ एप्रिल २०२४ रोजी ओळखपत्र, डायरी आदी अतिरिक्त फी वसुलीसाठी कोणत्याही विद्यार्थ्यांचे निकाल रोखता येणार नाहीत असे लेखी आदेश दिले आहेत. त्यामुळे पालकांनी शाळा व्यवस्थापनाच्या विरोधात कॅपिटेशन ॲक्ट तरतुदींचा भंग केल्याप्रकरणी व्यवस्थापनावर गुन्हा नोंद करण्यासाठी उरण पोलिस ठाण्यात जमा झाले होते.

# ठाण्याचा उमेदवार 'डमी' असल्याची गणेश नाईक समर्थकांची मुख्यमंत्र्यांवर टीका

■ **नवी मुंबई: धनश्री सट्टा**

**ठाणे लोकसभेच्या उमेदवारीवरुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि नवी मुंबईतील भाजप नेते गणेश नाईक यांच्यामधील सत्तासंघर्षाला नव्याने धार चढल्याचे चित्र गुरुवारी दिसून आले. या मतदारसंघासाठी शिंदेसेनेने निवडलेला उमेदवार हा 'डमी' असून नवी मुंबईचा राजकीय घास घेण्याचा हा कट असल्याचा आरोप करत गणेश नाईक यांच्या कट्टर समर्थकांनी त्यांच्या उपस्थितीतच आक्रमक भूमिका घेतली.**

ठाण्यातून नवी मुंबईचा कारभार हाकायचा. नवी मुंबईतील गणेश नाईकांचे राजकीय वर्चस्व हाणून पाडायचे आणि शहराचा कब्जा घ्यायचा असा राजकीय 'डाव' ठाण्यातून आखला जात असल्याचा आरोपही करण्यात आला. नाईकांच्या उपस्थितीत हे आरोपसत्र



सुरू असताना स्वत: गणेश नाईक आणि त्यांचे दोन पुत्र मात्र शांतपणे हे ऐकत होते. ठाणे मतदारसंघासाठी भाजपने संजीव नाईक यांच्या नावाचा आग्रह धरण्यात आला होता. महायुतीच्या जागा वाटपात हा मतदारसंघ भाजपला सुटेल असे चित्र गेल्या महिनाभरापासून निर्माण करण्यात आले होते. त्यामुळे नाईक कुटुंबियांना 'कामाला लागा' असा संदेशही वरिष्ठांकडून देण्यात आला होता. मतदारसंघ पदरात पडेल या आशेवर असलेल्या संजीव नाईक यांनी ठाणे, मिरा-भाईंदर या शहरांमध्ये प्रचारही सुरु केला होता. मात्र हा मतदारसंघ प्रतिष्ठेचा करत मुख्यमंत्री शिंदे यांनी उमेदवारी अर्ज भरण्यास दोन दिवसांचा अवधी शिल्लक असताना तो पदरात पाडून घेतला. या लोकसभा मतदारसंघातून बुधवारी सकाळी शिंदे यांनी माजी महापौर नरेश म्हस्के यांची उमेदवारी जाहीर केली. यानंतर दिवसभर या मतदारसंघातील भाजपच्या गोटात शुकशुकाट होता.

नवी मुंबईतील गणेश नाईक यांच्यासह त्यांच्या एकाही समर्थकाने प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती. गुरुवारी सकाळी गणेश नाईक यांनी खैरणे येथील क्रिस्टल हाऊस येथील त्यांच्या भव्य कार्यालयात एका बैठकीचे आयोजन केले आणि तेथून या संघर्षाला धार चढली. 'ठाणे'साठी नरेश म्हस्के यांना उमेदवारी देऊन नवी मुंबईचा घास घेण्याचा प्रयत्न ठाण्यातून सुरू आहे, असा आरोप यावेळी नाईक समर्थकांनी जाहीरपणे केला.

## राजेंद्र गावितांनी महाविकास आघाडीचा प्रचार करावा, भारती कामडी यांची खुली ऑफर

■ **वसई: दिगंबर जाधव**

उमेदवारी न मिळाल्याने नाराज असलेले शिंदे गटाचे खासदार राजेंद्र गावित यांना ठाकरे गटाने खुली ऑफर दिली आहे. नाराज आहात तर आम्हाला मदत आणि आमचा प्रचार असे महाविकास आघाडीच्या उमेदवार भारती कामडी यांनी जाहीरपणे सांगितले. रविवारी भारती कामडी नालासोपारामध्ये प्रचारासाठी आल्या होत्या. रविवारचा दिवस असल्याने सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार सुरू केला आहे. जिल्ह्यातील सर्वाधिक मतदार हे वसई विरार शहरात आहेत। त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी अशा दोन्ही पक्षांनी रविवारी वसईत प्रचारासाठी भर दिला आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवार शिवसेनेच्या भारती कामडी यांनी देखील नालासोपारामध्ये रविवारी प्रचार फेरी काढली. २९ गावे महापालिकेतून वगळणार तसेच ६९ गावांचा पाणी प्रश्न सोडवणार असे आश्वासन त्यांनी दिले. महायुतीने राजेंद्र गावित यांची उमेदवारी नाकारली. त्याबद्दल विचारले असता त्यांच्या पक्षाने कुणाला उमेदवारी द्यावी हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. मात्र राजेंद्र



गावित नाराज आहेत तर त्यांनी आम्हाला मदत करावी आणि आमचा प्रचार करावा असेही कामडी यांनी सांगितले. भारती कामडी यांनी गावित यांना दिलेली ही डिवचणारी ऑफर चांगलीच चांगलीच चर्चेत आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राजेंद्र गावित यांनी शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश केला होता आणि ठाकरे गटाचे खासदार म्हणून निवडून आले होते.

# नवी मुंबईत ५३५ आणि पनवेलमध्ये ७९ धोकादायक बांधकामे

■ **नवी मुंबई: धनश्री सट्टा**

**नवी मुंबई महापालिका क्षेत्रात गेल्या वर्षी ५१४ धोकादायक इमारती होत्या. यंदा ही संख्या ५३५ झाली असून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतीचे सन २०२४-२५ या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर एकूण ५३५ इमारती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ नुसार धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६५(अ) नुसार ज्या इमारतींचा वापर सुरू होऊन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे, अशा इमारतींचे नवी मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी संरचना अभियंत्याकडून संरचना परीक्षण करून घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. नवी मुंबई शहरातील नागरीकांनी धोकादायक इमारतीचा संरचनात्मक अहवाल ३०



सप्टेंबरपूर्वी करून न घेतल्यास २५ हजार रुपयांचा दंड केला जाणार आहे, महापालिकेने पाठविलेल्या सूचनेत नमूद करण्यात आले आहे. महापालिकेच्या सर्वेक्षणानुसार शहरात ५३५ धोकादायक इमारती आहेत. नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा / घराचा रहिवास / वापर तात्काळ थांबविण्यात यावा असे आवाहन करण्यात येत आहे. अन्यथा दुर्दैवी अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधितांची राहील याची नोंद घेण्यात यावी असे महापालिकेच्या वतीने सूचित करण्यात आले आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात ७९ धोकादायक मालमत्ता असून पालिकेने जाहीर प्रसिद्धी पत्रकातून या मालमत्तांच्या भोगवटाधारकांना पावसाळ्यापूर्वी संबंधित जागा रिकामी करण्याचे आदेश दिले आहेत. ३० वर्षे जुने बांधकाम असल्यास बांधकाम अभियंत्याकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा नियम आहे. काही वर्षांपूर्वी पनवेलमध्ये धोकादायक इमारत कोसळली होती. अतिवृष्टीमध्ये पनवेलमध्ये धोकादायक इमारतीमध्ये अनुचित घटना घडू नये यासाठी पालिकेने खबरदारी म्हणून मे महिन्यापासून धोकादायक इमारतींच्या मालमत्ताधारकांना सूचना पत्रातून जागृत करण्याचे काम केले आहे.

## नालासोपारा द्वारका हॉटेल आग प्रकरण : ४ दिवसांनी ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल

■ **वसई: दिगंबर जाधव**

नालासोपारामधील द्वारका रुग्णालयाला लागलेल्या आगीप्रकरणी अखेर ४ दिवसांनी आचोळे पोलिसांनी ठेकेदारावर गुन्हा दाखल केला आहे. रस्ता खोदताना हलगर्जीपणा केल्याने गॅसपाईपलाईन पुटल्याने आग लागल्याचे स्पष्ट झाल्याने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगळवार ३० एप्रिल रोजी नालासोपारा पूर्वेच्या आचोळे येथील द्वारका हॉटेलला आग लागली होती. या आगीत सिलेंडरचा स्फोट होऊन हॉटेल जळून खाक झाले होते. तर हॉटेलमधील कर्मचारी आणि ग्राहक मिळून ८ जण जखमी झाले होते. या हॉटेलच्या समोरील रस्त्यावर गटारीसाठी खोदकाम सुरू होते. मात्र ते काम चुकीच्या पद्धतीने सुरू होते. मंगळवारी साडेतीनच्या सुमारास काम सुरू असताना जेसीबीने रस्ता खणताना गॅसपाईपलाईन फुटली आणि हॉटेलमध्ये आग लागली होती. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी जेसीबीचालक, रस्त्याचे काम करणारा ठेकेदार यांच्या विरोधात हलगर्जीपणे काम करून मानवी जीवास धोका उत्पन्न केल्याचा ठपका ठेवला आहे. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी पूर्ण झाल्यानंतर आचोळे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक



मंगेश वडणे यांनी फिर्याद दाखल केली. या फिर्यादीनुसार ठेकेदार, जेसीबीचा चालक यांच्यासह अन्य जणांविरोधात कलम २८५, ३३६, ३३७, ३३८, ४२७ सह भारतीय वीज नियामक अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, गटारीचे काम योग्य पद्धतीने होत नसून यामुळे परिसरातील इमारतींना धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा आचोळे पोलिसांनी दुर्घटनेच्या काही दिवसांपूर्वीच दिला होता.

## विरारमध्ये ५ अनधिकृत इमारती, ३८ दुकाने आणि २५८ सदनिकांची विक्री

■ **वसई: प्रतिनिधी**

विरारमध्ये ५५ अनधिकृत इमारतींचे प्रकरण ताजे असताना देखील अनधिकृत इमारती बांधण्याचे प्रकार थांबलेले नाहीत. विरारच्या फूलपाडा येथे ४ मजल्याच्या एकूण ५ अनधिकृत इमारती बांधून त्यातील ३८ दुकाने आणि २५८ सदनिकांची विक्री केल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी इमारतीच्या विकासकावर पालिकेच्या तक्रारीनंतर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मागील वर्षी विरारमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे वसई विरारमध्ये ११७ अनधिकृत इमारती बांधल्या गेल्याचे प्रकरण उघडकीस आले. यात शासनासह शेकडो कुटुंबांची फसवणूक करण्यात आली होती. जिल्हाधिकाऱ्यांपासून पालिकेपर्यंत, महारेरापासून सिडकोपर्यंतच्या सर्व शासकीय विभागांची बनावट शिक्के, लेटरहेड बनविण्यात आली होते. या बेकायदेशीर इमारतींच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्जे देऊन सदनिकांची विक्री करण्यात आली होती. या



प्रकरणाची व्याप्ती वसई विरारच्या विविध भागात होती. त्यानंतर अनधिकृत इमारतींच्या प्रकरणाला आळा बसेल अशी आशा होती. परंतु आजही शहरात राजरोस अनधिकृत इमारती बांधल्या जात असल्याचे प्रकार सुरूच आहेत. विरार पूर्वेच्या फुलपाडा येथे पालिकेची कुठलीही परवानगी न घेता ५ अनधिकृत इमारती बांधल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. फुलपाडा येथील भूमापन क्रमांक (सर्व्हे नंबर) ८६ हिस्सा नंबर १ या ठिकाणी पालिकेची कुठलीही परवानगी न घेता चार मजल्यांच्या एकूण ५ इमारती तयार करण्यात आल्या आहेत. या अनधिकृत इमारतींमधील ३८ दुकाने आणि २५८ सदनिकांची विक्री करून सर्वसामान्य ग्राहकांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी पालिकेच्या प्रभाग समिती 'सी'चे (चंदनसार) लिपिक अशोक धानिया यांनी विरार पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी विकासक आणि जमीन मालकांविरोधात महाराष्ट्र नगर रचना प्रांतिक अधिनियमच्या (एमआरटीपीए) कलम ५२, ५३, ५४ अन्वये गुन्हे दाखल केले आहेत.

# बारामतीत प्रचाराची सांगता वाक्युद्धाने; शरद पवार यांचा इशारा 'सत्तेचा गैरवापर केल्यास, दमदाटी करणाऱ्यांना जागा दाखवू'

■ **पुणे: गणेश साळवी**

ज्या लोकांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली आहे, ते लोक तुम्हाला दमदाटी करत असतील. मात्र, तुम्ही चिंता करू नका. शरद पवार कायम तुमच्या पाठीशी राहील. कोणी सत्तेचा गैरवापर केला, तर त्यांना त्यांची जागा दाखवण्याचे काम आम्ही दोन दिवसांत करू शकतो, अशा शब्दांत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी विरोधकांना प्रचार सांगता सभेत इशारा दिला. पवार यांनी भोर, इंदापूर आणि बारामती येथे जाहीर सभा घेतल्या. लोकसभा निवडणुकांसाठीची यंदाची ही बारामतीमधील शेवटची सभा आहे, आपण दरवर्षी शेवटची सभा ज्या प्रांगणात घेतो, ती जागा यंदा सत्ताधाऱ्यांनी ताब्यात घेतली. पण, कुणी जागा अडवली म्हणून आपले काही नुकसान होऊ शकत नाही. सातत्याने भाषण केल्याने घसा बसला असतानाही आणि तोंडातून शब्द फुटत नसतानाही पवार यांनी सुप्रिया सुळे यांच्यासाठी बारामतीमधील सभेत काही वेळ भाषण केले. त्यांनी भाषण आटोपते घेताच, उपस्थितांनी पवारांचा जयघोष केला. बारामतीमधील सभेत सुप्रिया सुळे यांनी गेल्या दहा वर्षांत मी काहीच काम केले नाही, हा आरोप मला मान्य नाही. मात्र, या आरोपांना मी फार उत्तर देणार नाही,




कारण सत्य त्यांनाही माहिती आहे. येत्या सात तारखेला बारामतीकरांच्या सेवेची संधी देण्यासाठी पुन्हा चौथ्यांदा निवडून देण्याचे आवाहन त्यांनी या वेळी केले. मी लोकांना दम दिला असता, तर मला २५-३० वर्षे बारामतीकरांनी निवडून तरी दिले असते का? असा सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला. ज्यांना आपण १५ वर्षे खासदार केले, पण या कार्यकाळात केंद्राचा निधी बारामती लोकसभा मतदार संघात येऊ शकला नाही. पंतप्रधान मोदी आणि अमित शहांवर टीका करून आणि संसदरत्न मिळवून बारामतीचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही, अशी टीकाही त्यांनी केली. महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या बारामती येथे झालेल्या प्रचार सांगता सभेत उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. यावेळी पवार यांनी कोणाचेही नाव न घेता वैकक्तिक टीका करणाऱ्यांना इशारा दिला.

ते म्हणाले की, महिला लोकसभेवर गेल्यानंतर त्यांचा नवरा काय पर्स घेऊन जाणार का? अशी टीका करण्यात आली. आपण लोकसभेवर गेल्यावर आपले पती पर्स घेऊन जातात काय? सुनेत्रा पवार या खासदार झाल्यावर मी काय पर्स घेऊन जाणार काय? मी बोलायला लागलो, तर तुम्हाला पळता भुई थोडी होईल.

## पंतप्रधानांचे कार्यालय हे वसुली कार्यालय

■ **सांगली: संजीनी खाडे**

पंतप्रधान कार्यालय हे वसुली कार्यालय बनले असून ईडी, सीबीआय, पोलीस या यंत्रणांचा वापर करून निवडणूक रोख्याच्या माध्यमातून वसुली केली जाते. करोना काळात बंदी असलेल्या औषध विक्रीला परवानगी देण्यासाठी १८ कोटींची वसुली निवडणूक रोख्यातून केली. अशा मौत का सौदागरच्या हाती पुन्हा देश देण्याची चूक करू नका, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी रविवारी मिरजेत केले. सांगली लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांच्या प्रचाराच्या सांगता सभेत अॅड. आंबेडकर बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा जयश्री पाटील, गवई गटाचे नेते डॉ. राजेंद्र गवई, माजी मंत्री अजितराव घोरपडे आणि माजी स्थायी सभापती निरंजन आवटी यांची भाषणे झाली. यावेळी अॅ



ड. आंबेडकर यांनी भाजपवर जोरदार टीकास्त्र सोडले. ते म्हणाले, करोना काळात जागतिक आरोग्य संघटनेने बंदी घातलेल्या रेमडिसिवयरचे उत्पादन गुजरातमधील कंपनीकडून केले जात होते. १८ कोटी रुपये निवडणूक रोख्यातून मिळाल्यानंतर या औषधाच्या विक्रीला देशात परवानगी देण्यात आली. या औषधाचे दुष्परिणाम म्हणून अनेकांना व्याधी जडल्या. अशा मौत का सौदागरला आपण पुन्हा संधी द्यायची का याचा विचार करण्याची वेळ आली आहे. पंतप्रधान कार्यालय हे मानवतेचे कार्यालय असायला हवे. मात्र, या ठिकाणाहून निवडणूक रोख्याच्या माध्यमातून ईडी, सीबीआय, पोलीस या यंत्रणाचा वापर करून खंडण्या गोळा करण्यात येतात. गेल्या दहा वर्षाच्या काळात देशातील ५० कोटींहून अधिक मालमत्ता असलेल्या १७ लाख हिंदू कुटुंबांनी देश सोडला.

## हिंदु-मुस्लिम ध्रुवीकरणाचा भाजपला मोठा फटका बसेल: काँग्रेस नेते मुजफ्फर हुसेन यांची टीका

■ **कराड: आकाश कांबळे**

कराड – महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष, अग्निवीर, आदिवासी, दलित, अल्पसंख्यांक समाजासह इतरही लोक नाराज आहेत. विकासाच्या मुद्दा सोडून जाती-जाती, समाज-समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असून हिंदु-मुस्लिम ध्रुवीकरणाबाबत लोकांमध्ये चिड निर्माण झाल्याने त्याचा भाजपला मोठा फटका बसेल अशी टीका काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष, माजी आमदार मुजफ्फर हुसेन यांनी केली.

लोकसभेच्या सातारा मतदारसंघातील इंडिया आघाडीचे उमेदवार आमदार शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ मुजफ्फर हुसेन यांनी रविवारी प्रचारदौरा केला. त्यानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे नेते झकीर पठाण या वेळी उपस्थित होते. हुसेन म्हणाले, सध्या लोकसभा निवडणुकीत भाजपविरोधी वातावरण आहे. हे दोन टप्प्यांमधील लोकसभा निवडणुकीच्या मतदानावरून दिसून आले. भाजपच्या 'अबकी बार चारसौ पार'चा आकडा आता निम्म्यावर आला आहे.



त्यामुळे संयम सुटलेले पंतप्रधान प्रचारसभांमध्ये खालच्या पातळीवर बोलत आहेत, हे कोणालाही आवडलेले नाही. तसेच निवडणूक आयोगाने सांगितलेले मतदानाचे आकडे वाढवून सांगणे हे चुकीचे आहे. निवडणूक आयोगाच्या निकालावर भाष्य करणे योग्य नसून हा निवडणूक आयोगाचा अपमान असल्याचा आरोप हुसेन यांनी केला.संपूर्ण राज्यभरात प्रचाराच्या अनुषंगाने फिरताना इंडिया आघाडीला चांगले वातावरण असल्याचे दिसून येत आहे. सातारा मतदारसंघातही शशिकांत शिंदे यांना पोषक वातावरण असून ते चांगल्या मतांनी निवडून येतील. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे सर्वांना सोबत घेऊन जाणारे नेतृत्व आहे. त्याचा फायदा नक्कीच शशिकांत शिंदे यांना झाल्याखेरीज राहणार नाही. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कराडमधील सभेत पंतप्रधानांनी कर्नाटकातील मुस्लिमांना काँग्रेसने एका रात्रीत ओबीसीचे आरक्षण आणि ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणावर दरोडा टाकल्याची टीका केली आहे. याबाबत विचारले असता ते म्हणाले, नरेंद्र मोदी फक्त 'सबका साथ सबका विकास' म्हणतात.

# 'कितीही प्रयत्न केला तरी शरद पवारांची जागा कुणीही घेऊ शकत नाही', रोहित पवारांचा अजित पवारांना टोला!

■ **मुंबई: राकेश गायकवाड**

आपल्या काही लोकांनी पक्षातून बाहेर पडताना पक्ष, चिन्ह आणि आपली जागा चोरून नेली. मात्र, त्यांनी कितीही जागा चोरायचा प्रयत्न केला, तरी शरद पवारांची जागा कुणीही घेऊ शकत नाही, असा टोला रोहित पवार यांनी अजित पवार यांना लगावला आहे. तसेच या निवडणुकीत सुप्रिया सुळे या तीन लाखांपेक्षा जास्त मतांनी निवडून येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. ते बारामतीतील प्रचारसभेत बोलत होते.

'बारामतीत मी अनेकदा सुप्रिया सुळे यांचा प्रचार केला आहे. मात्र, यंदाचं वातावरण जरा वेगळं आहे. कारण आपल्यातील काही लोक आता भाजपाबरोबर गेले आहेत. एक कुटुंबातील सदस्य म्हणून मला या गोष्टींचं प्रचंड वाईट वाटतं. पण हा त्यांचा वैयक्तिक निर्णय आहे. त्यांनी जाताना पक्ष आणि चिन्ह चोरून नेले एवढंच नाही तर त्यांनी आपली जागाही चोरून नेली. मात्र, त्यांनी कितीही जागा चोरायचा प्रयत्न केला, तरी शरद पवार यांची जागा कोणीही घेऊ शकत नाही', अशी





प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली. 'शरद पवार हे महाराष्ट्राच्या आणि देशातील जनतेच्या हृदयात आहेत. त्यांनी गेल्या ६० वर्षात महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या जनतेच्या हितासाठी काम केलं आहे. त्यांनी प्रचाराची सुरुवात सायकलवरून केली होती. त्यावेळी त्यांच्या प्रचाराला हजर असलेल्या प्रत्येक कार्यकर्तांची नावे त्यांना आजही तोंडपाठ आहेत. सुरुवातीला आमदार त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री, संरक्षण मंत्री ते कृषीमंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. पद असताना त्यांनी घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा फायदा आजही अनेकांना होतो आहे. त्यामुळेच शरद पवार यांची जागा घेणं सोपी नाही', असेही ते म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी सुप्रिया सुळे यांच्या विजयाचा विश्वासही व्यक्त केला. 'चार तारखेला सुप्रिया सुळे यांची विजयाची सभा कशी असेल, याचे ट्रेलर आज बारामतीतील जनतेने दाखवून दिलं आहे.

## सत्तांतराच्या वातावरणामुळे पवार, ठाकरेंवर बोलताना मोदी गोंधळलेत, पृथ्वीराज चव्हाणांची जोरदार टीका

■ **कराड: माधव अलवा**

ॲडॉल्फ हिटलरच्या 'एक राष्ट्र- एक सरकार, एक नेता' थोरणानुसार नरेंद्र मोदी हुकुमशाहीकडे चाललेत. त्यासाठी रशिया, चीन, उत्तर कोरियाच्या नेतृत्वाप्रमाणे त्यांचे व्यक्तिस्तोम सुरु आहे. परंतु, केंद्रात निश्चितपणे सत्तांतराचे वातावरण असल्याने शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना, मोदी गोंधळलेत अशी टीका माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत केली. चव्हाण म्हणाले, लोकसभेची ही निवडणूक भ्रष्टाचार, बेरोजगारी, महागाई, भरमसाठ करवाढ, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडील दुर्लक्ष आणि अत्याचाराच्या मुद्द्यांसह संविधान वाचवण्यासाठीची लढाई आहे. त्यात शेतकरी, कष्टकरी, युवक, महिलांसह सर्वच घटक मोदींना माफ करणार नाहीत. त्यामुळे भाजपकडील पूर्वीच्या ३१ टक्के मतातही घट होईल. संसदेतील विरोधी ३८ पक्ष त्यांच्या समोर असल्याने कोणत्याही राज्यात भाजपला पूर्वीप्रमाणे यश मिळणार नाही. 'चारशे'पार सोडा, गतखेपेच्या ३०३ पेक्षाही खूपच कमी जागा मिळून भाजपला मित्रपक्षांच्या सहकार्यानेही सत्ता मिळणार नाही. केंद्रात निश्चितपणे सत्तांतर होईल, त्यात महाराष्ट्राची भूमिका महत्वाची असेल, विरोधी पक्षांना अनपेक्षित घवघवीत यश मिळेल असा दावा चव्हाण यांनी केला. कर्नाटकातील प्रज्वल रेवण्णा यांचे लैंगिक शोषणप्रकरण आणि निवडणूक रोख्यांवरून चव्हाण यांनी टीकास्त्र सोडले.




डॉ. मनमोहन सिंग यांच्या केंद्र सरकारमधील देशाचा आर्थिक विकासदर मोदीकाळात घसरलेला आहे. पूर्वीचा विकासदर कायम असता तर जगात भारताची अर्थव्यवस्था पाचव्या नव्हेतर तिसऱ्या स्थानावर असती. पण, केंद्र सरकारकडे आज पगाराला, खर्चालाही पैसे नाहीत. महागाई, भ्रष्टाचारामुळे जनता ग्रासल्याची टीका चव्हाण यांनी केली.

राज्यात ठाकरे सरकार राहिले असते तर लोकसभेला 'महायुती'ची एकही जागा निवडून आली नसती. त्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस भाजपने फोडले. पण, लोकसभा निवडणुकीनंतर समीकरणे बदलतील. राज्यातील दोन पक्ष संपतील किंवा इतर पक्षांमध्ये विलीन होतील असे भाकीत करीत चव्हाण यांनी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अस्तित्वाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## 'हेमंत करकरेंना लागलेली गोळी कसाबच्या बंदुकीतील नव्हती, उज्ज्वल निकमांनी...'; विजय वडेट्टीवारांच्या विधानाने खळबळ

■ **मुंबई: सम्यक कासारे**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सुरू असतानाच काँग्रेसचे नेते, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या एका विधानामुळे राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. 'आयपीएस अधिकारी हेमंत करकरे यांना लागलेली गोळी ही दहशतवाद्याच्या बंदुकीतील नव्हती', असे विधान विजय वडेट्टीवार यांनी केले आहे. तसेच भाजपाचे उत्तर मध्य मुंबईतील उमेदवार प्रसिद्ध वकील उज्ज्वल निकम यांनी हे सत्य न्यायालयापासून लपवून ठेवल्याचा आरोपही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. 'आयपीएस अधिकारी हेमंत करकरे यांना लागलेली गोळी ही दहशतवाद्याच्या बंदुकीतील नव्हती तर संघाशी समर्थित पोलीस अधिकाऱ्याने झाडली होती. हे सत्य अॅड.उज्ज्वल निकम यांनी न्यायालयापासून लपवून ठेवले आहे', असे विधान वडेट्टीवार यांनी केले. त्यानंतर पुन्हा या विधानावर स्पष्टीकरण देताना वडेट्टीवार म्हणाले, 'आपण हे एस. एम. मुश्रीफ यांच्या पुस्तकाचा



दाखला देऊन बोललो आहे. यामध्ये मी काहीही म्हटले नसून विलासराव देशमुख त्यावेळी म्हणाले होते की, कसाबला फाशी झाली म्हणजे श्रेय घेण्याची गरज नाही. कारण कसाब दहशतवादी होता, त्याला फाशी होणारच होती. त्यामुळे बडेजावपणा दाखवायची गरज नाही. मी एस. एम. मुश्रीफ यांच्या पुस्तकाचा दाखला दिला असून याबाबत त्यांना (उज्वल निकम यांना) काही खुलासा करायचा असेल तर त्यांनी करावा', असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

'मुंबई दहशवादी हल्ला प्रकरणी न्यायालयामध्ये जे पुरावे सादर करायला हवे ते उज्ज्वल निकम यांनी सादर केले नाही', असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. विजय वडेट्टीवार यांच्या या विधानावरुन राजकारण तापले आहे. मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघामधून भाजपाने उज्ज्वल निकम यांना लोकसभेचे तिकीट दिलेले आहे. उज्ज्वल निकम यांच्या विरोधात काँग्रेसच्या वर्षा गायकवाड निवडणुकीच्या मैदानात आहेत. सध्या प्रचार जोरदार सुरू असून विजय वडेट्टीवार यांच्या विधानाला आता भाजपाच्या नेत्यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

## 'शिवसेनेतील बंडाची माहिती अजित पवारांनाही होती, पण...', शिंदे गटातील नेत्याचा मोठा दावा

■ **मुंबई: यश सावंत**

दोन वर्षांपासून शिवसेनेत उभी फूट पडून पक्षाचे दोन गट झाले. ठाकरे गट आणि शिंदे गटात विभागणी झाल्यानंतर राज्यात वेगळं राजकीय समिकरण पाहायला मिळालं. परंतु, या बंडाआधी उद्धव ठाकरेंना अनेकदा अनेकांनी माहिती दिली होती. परंतु, त्यांनी दुर्लक्ष केलं असल्याची दावा केला जातोय. तसंच, याबाबत अजित पवारांनाही माहिती होती, असं शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट म्हणाले.



अजित पवार यांना आमच्या बंडाची कल्पना होती. त्यांनी ती उद्धव ठाकरेंना सांगितली होती. मात्र त्यांच्या चमच्यांनी त्यांची दिशाभूल केली. त्यामुळे उद्धव ठाकरेंनी लक्ष दिले नाही. त्यानंतर उद्धव ठाकरेंनी केलेली धावपळ आपण पहिली, असं संजय शिरसाट म्हणाले. उद्धव ठाकरे गटाच्या जाहीरनाम्यात महिला संरक्षण विषय आहे. महिलांचा आदर करू म्हणतात, मात्र स्वप्ना पाटकर या महिलेवर काही लोक पाळत ठेवत आहेत. बीकेसीला जाताना एक मोटार सायकल तिचा पाठलाग करते, तिला धमक्या येतात, तिच्या जीवाला धोका आहे. तिने पोलिसात अनेक तक्रारी दिल्या आहेत. प्रकरण गंभीर आहे. मात्र कारवाई का होत नाही? असा त्यांचा सवाल आहे. या संदर्भात एसआयटी स्थापन करा अशी त्यांची मागणी आहे. याबाबत मी मुख्यमंत्र्यांसोबत बोलणार आहे आणि त्या महिलेला न्याय द्यावा ही मागणी करणार आहे, असंही संजय शिरसाट म्हणाले. 'एक व्हीडिओ मी पाहिला. शरद पवार उद्धव ठाकरेंना बाहेर बसायला सांगत आहेत. ४ जून नंतर अवस्था काय होईल ते देवाला आणि अल्लाहला माहिती, असंही ते म्हणाले. तसंच, आमदार आणि खासदारांबाबत तुम्ही जे म्हणताय त्यामुळं शिवसैनिक दुखावला गेलाय. या इतक्या लोकांनी अनेक वर्षे शिवसैनिकांसोबत काम केलंय, सेना जपली आहे, तुमची वक्तव्य पहा. बाळासाहेब आमचं दैवत आहेत, आम्ही हिंदूहृदयसम्राट म्हणण्याची ताकत ठेवतो. तुमच्या नेत्यांना राहुल, पवारांना असे बोलायला लावा', असं आव्हानही त्यांनी दिलं.


# शरद पवार माढ्याचा एकही प्रश्न सोडवू शकले नाहीत -फडणवीस

■ **वाई: माधव अलवा**

लोकांना नेहमी वेगवेगळ्या गोष्टी सांगून फसवणारे शरद पवार माढ्याचे खासदार असताना त्यांनी मतदारसंघाचा एकही प्रश्न सोडवला नाही. मतदार संघात पाण्याचा एकही थेंब आणला नाही. विकास करू शकले नाहीत, त्यामुळे त्यांच्या उमेदवाराच्या तुतारीची पिपाणी रणजीतसिंह नाईक निंबाळकर केल्याशिवाय राहणार नाहीत असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साताऱ्यातील फलटण येथे सांगितले.मोदी हे एकमेव नेते आहे की ते सर्वांचं भलं करू शकतात ज्या देशाचा नेता सक्षम, कणखर असतो तो देशच प्रगतीपथावर राहतो असेही फडणवीस म्हणाले,

महायुतीचे माढा मतदारसंघातील उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या सांगता प्रचार सभेत फडणवीस बोलत होते. यावेळी रणजितसिंह नाईक निंबाळकर, महादेव जानकर, मतदारसंघाचे समन्वयक प्रसाद लाड आदी उपस्थित होते. यावेळी रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी मोठे शक्ती प्रदर्शन केले.

फडणवीस म्हणाले, ही लढाई रणजितसिंह नाईक निंबाळकर व धैर्यशील मोहिते पाटील अशी नाही तर या पाठीमागचे मोठे गणित माढा मतदारसंघात दडलेले आहे. या मतदारसंघात पूर्वी खासदार राहिलेले शरद पवार यांनी सांगितले होते की माढा मतदारसंघातील सर्व प्रश्न सोडवितो. त्यावेळी ते देशाचे नेते होते, केंद्रात मंत्री होते. पण त्यांच्या काळात या भागात पाण्याचा एकही थेंब आला नाही. कोणताही विकास झाला नाही. ते करू शकले नाहीत. या भागात येणारे पाणी तुमच्याकडे पोहोचल्यास ते कुठे गेले होते हे तुम्हाला कळले असते म्हणून त्यांनी याकडे बघितले नाही असा बारामतीचा उल्लेख न करता ते बोलले. तुम्ही रणजीतला निवडून दिल्यानंतर तुमचे चोरीला गेलेले पाणी परत आणले आहे. त्याचे काम सुरू



झाले आहे. या मतदारसंघात देशाचे किंवा परदेशाचे नेते येऊ द्यात. पण रणजीतच कोणीही वाकड करू शकणार नाही. विरोधी नेते म्हणतात माळशिरस अकलूज आमच्या पाठीशी आहे. परंतु आता फलटणकरांनीच रणजीतचा विषय अस्मितेचा केला आहे.

रामराजे नाईक निंबाळकर यांनी उचित निर्णय घेतला नाही. काही विषय अस्मितेचे आणि विकासाचे असतात. त्याच्या विरोधात निर्णय घेतला तर लोक आपल्याला लक्षात ठेवत नाहीत. काही झाले तरी फलटणमध्ये कमळ फुलणार आहे आणि मागील मताधिक्यापेक्षा जास्त मतांनी भाजपचा उमेदवार निवडून येणार आहे. या माढा मतदारसंघासाठी भीमा स्थिरीकरण,वासना वंगना योजना, नीरा देवधर आणि धोम बलकवडीच काम होऊ द्यात या परिसरात एकही गाव दुष्काळी राहणार नाही. फलटण पंढरपूर रेल्वेचे काम ही मार्गी लावल आहे. या भागात विशेष कॉरिडॉर होत असल्यामुळे एमआयडीसी ही मोठ्या प्रमाणात येणार आहे. त्यामुळे येथील तरुणांना कोठेही रोजगारासाठी बाहेर जावे लागणार नाही. हा सर्व भाग आता पाणीदार होईल. रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांना पंतप्रधान स्वतः ओळखतात आणि त्यांच्या कामाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहेत.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मोदी को हराना मुश्कीलही नही...

■ ठाणे: तृप्ती गोरे

एकीकडे देशाला वाचवायला, लोकशाहीला पुढे नेण्यासाठी आणि विकास करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. तर, दुसरीकडे देश बुडवायला निघालेली इंडीया आघाडी आहे. देशभक्त त्यांना थारा देणार नाहीत. त्यामुळेच मोदी को हराना मुश्कीलही नही, नामुमकीन है, असे विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात केले. तसेच पप्पु आधीच फेल झाला असून त्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा फेल करतील, असे सांगत त्यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली. ठाणे लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे उमदेवार नरेश म्हस्के यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी काढलेल्या मिरवणुकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे, राहुल गांधी आणि इंडीया आघाडीवर टीका केली. २०१४ पूर्वी देशात भ्रष्टाचार,



दंगली आणि बॉम्बस्फोट घडत होते. पण, त्यानंतर एकदाही बॉम्बस्फोट करण्याची कुणाची हिमंत झाली नाही. कारण, भारताकडे डोळे वटारून पाहिले तर घरात घुसून मारु असा इशारा मोदींनी दिला. त्यामुळे पुन्हा एकदा मोदी पंतप्रधान होणार आहेत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. घरात बसून किंवा फेसबुक लाईव्ह करून काम करता येत नाही. त्यासाठी जमिनीवर उतरुन काम करावे लागते. गेल्या दोन वर्षापासून मी जमिनीवर उतरुन काम करतोय. याआधीही मीच काम करत होतो पण, त्याचे श्रेय दुसरे घेत होते, असे सांगत त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टिका केली. बाबासाहेबांचे संविधान बदलणार असे विरोधकांकडून बोलले जात असून ते चुकीचे आहे. संविधान बदललेले जाणार नाही. देशात संविधान दिवस साजरा करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. तर, बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकीत पाडण्याचे काम कॉंग्रेसने केले, असेही ते म्हणाले.

# पंतप्रधान मोदींच्या गुजरातमध्ये मुस्लीम फक्त मतदानासाठी; उमेदवारी कुणालाच नाही, का झालं असं?

■ अहमदाबाद: वृत्तसंस्था

गुजरातमधील सुरत मतदारसंघामध्ये बिनविरोध निवडणूक होऊन भाजपाचा उमेदवार निवडून आल्यानंतर बरीच चर्चा झाली. ३० वर्षापासून या राज्यात भाजपाचे प्राबल्य आहे. मात्र, आता गुजरात राज्य आणखी एका कारणासाठी विशेष चर्चेत आले आहे. २०२४ च्या या लोकसभा निवडणुकीमध्ये गुजरात राज्यात फक्त बहुजन समाज पार्टी या एकाच राष्ट्रीय पक्षाने मुस्लीम व्यक्तीला उमेदवारी दिली आहे. कॉंग्रेसनेही या राज्यामध्ये मुस्लीम व्यक्तीला उमेदवारी देण्याचे टाळले आहे.

गुजरातमध्ये एकूण २६६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यापैकी एकूण ३२ उमेदवार हे मुस्लीम आहेत. उद्या मंगळवारी (७ मे) गुजरातमध्ये मतदान होणार आहे. निवडणुकीच्या रिंगणात



उतरलेले बहुसंख्य मुस्लीम हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवीत आहेत; तर इतर काही मुस्लीम उमेदवार हे छोट्या पक्षांकडून उभे आहेत. भारतीय जननायक पार्टी (खेडा), लोग पार्टी (नवसारी), राईट टू रिकॉल पार्टी (खेडा) व द सोशल डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (पाटन व नवसारी) या पक्षांनी मुस्लिम व्यक्तींना उमेदवारी दिली आहे. गांधीनगर हा सर्वाधिक संख्येने मुस्लीम उमेदवार रिंगणात असलेला मतदारसंघ ठरला आहे. या ठिकाणी गृहमंत्री अमित शाह भाजपाकडून उभे आहेत; तर कॉंग्रेसकडून सोनल पटेल यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भरुच व पाटन या दोन्ही मतदारसंघांतून चार मुस्लीम उमेदवार रिंगणात आहेत. गुजरातच्या एकूण लोकसंख्येपैकी १० टक्के मुस्लीम आहेत. जवळपास १५ मतदारसंघांमध्ये त्यांची लोकसंख्या तुलनेने अधिक आहे. त्यामध्ये कच्छ, जामनगर, जुनागढ, भरुच, भावनगर, सुरेंद्रनगर, पाटन, बनासकांठा, साबरकांठा, अहमदाबाद पश्चिम, अहमदाबाद पूर्व, गांधीनगर, नवसारी, पंचमहाल व आनंद या मतदारसंघांचा समावेश होतो. कॉंग्रेसने भरुच मतदारसंघातून २००४ साली मोहम्मद पटेल, २००९ साली अजिज टंकारवी व २०१९ साली शेरखान पठाण या मुस्लीम उमेदवारांना रिंगणात उतरवले होते. भरुच हा कॉंग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते अहमद पटेल यांचा बालेकिल्ला होता. गुजरातमध्ये कॉंग्रेस आणि आपने युती केली आहे आणि या मतदारसंघातून इंडिया आघाडीचे प्रतिनिधित्व आप करणार आहे. 'आप'ने या ठिकाणी विद्यमान आमदार चैतर वसावा यांना उमेदवारी दिली आहे. २०१४ मध्ये कॉंग्रेसने भरुचमधून जयेश पटेल यांना उमेदवारी दिली होती; तर नवसारीमध्ये भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सी. आर. पाटील यांच्याविरोधात मुस्लीम उमेदवार दिला होता. गेल्या दोन्ही लोकसभा निवडणुकांमध्ये गुजरातमधील सर्व २६ जागांवर भाजपाचेच उमेदवार विजयी ठरले आहेत.

# कांद्यावरील निर्यातबंदी अखेर हटवली; पण ४० टक्के शुल्कही लावले, शेतकरी म्हणतात...

■ मुंबई: प्रथमेश चव्हाण

कांदा निर्यातीवर गेल्या काही काळापासून बंदी लावल्यानंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. विशेषतः महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्रात कांद्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. नाशिक, दक्षिण अहमदनगर या दोन लोकसभा मतदारसंघात कांदा निर्यातीचा महत्त्वाचा प्रश्न होता. दोन टप्प्याचे मतदान झाल्यानंतर केंद्र सरकारने अखेर शुक्रवारी (३ मे) कांदा निर्यातीवरील बंदी हटविण्याचा निर्णय घेतला. कांदा निर्यातीवर आता ४० टक्के शुल्क लावून निर्यातीला परवानगी देण्यात आली आहे. तसेच ३१ मार्च २०२५ पर्यंत देशी चण्याच्या आयातीवरील शुल्कात सूट दिली आहे. केंद्र सरकारच्या निर्णयाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले. एक्सवर प्रतिक्रिया देताना ते म्हटले, 'कांदा निर्यात बंदी संपूर्णतः मागे घेण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे अनेकानेक आभार. केंद्र सरकारने काल



रात्री याबाबतची अधिसूचना जारी केली. महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना याचा मोठा लाभ मिळणार आहे. सरसकट निर्यातीला परवानगी देतानाच कांदा उत्पादकांना चांगला भाव मिळावा, याचीही काळजी घेण्यात आली आहे.'

दिंडोरीच्या भाजपाच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली. तसेच ४० टक्के शुल्क का आणि कसे लावले गेले? याचाही खुलासा केला. त्या म्हणाल्या, विरोधकांना कांदा निर्यातबंदीचा निर्णय मागे घेतला, हे मान्य होत नाही. कांद्याला चांगला दर मिळेल, शेतकऱ्यांच्या खिशात पैसे जातील, हा निर्णय केंद्र सरकार घेईल, अशी अपेक्षा विरोधकांना नव्हती. त्यामुळे त्यांचा भ्रमनिरास झाला आहे. कांदा निर्यातीवर प्रति मेट्रिक टन निर्यात शुल्क लावले गेले आहे. तसेच वेगवेगळ्या देशांसाठी वेगवेगळे शुल्क लावले आहे. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे निर्यात खुली झाली आहे, त्याचा सर्व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भारती पवार यांनी केले. मागच्याच आठवड्यात केंद्र सरकारने गुजरातमधून दोन हजार टन पांढरा कांदा निर्यातीला परवानगी दिली होती. यानंतर विरोधकांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. त्यानंतर केंद्र सरकारने २०२३-२४ मध्ये एकूण ९९,१५० टन कांदा निर्यात झाला असल्याचे सांगितले. हे सांगत असताना केंद्र सरकारने कांदा निर्यातीवरील बंदी उठविल्याचे चित्र २८ एप्रिल रोजी रंगवले गेले होते. मात्र दुसऱ्याच दिवशी विरोधकांनी ही धूळफेक नजरेस आणून दिली.

# मंत्र्यांच्या नोकराच्या घरात सापडलं कोट्यवधींचं घबाड; नोटांचे ढीग पाहून अधिकारीही चक्रावले!

■ झारखंड: वृत्तसंस्था

झारखंडमध्ये अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) तब्बल ९ ठिकणी छापे टाकले आहेत. यामध्ये झारखंड सरकारमधील एका मंत्र्यांच्या खासगी सचिवाच्या नोकराच्या घरी छापा टाकण्यात आला असून यामध्ये कोट्यवधींची रोकड जप्त करण्यात आली आहे. याबरोबरच काही अभियंत्यांच्या घरीही ईडीने छापेमारी केली असल्याची माहिती समोर येत आहे. लोकसभा निवडणूक सुरु असतानाच ईडीने केलेल्या या मोठ्या कारवाईमुळे झारखंडमध्ये एकच खळबळ उडाली आहे.



झारखंडचे ग्रामीण विकास मंत्री आलमगीर आलम यांचे खासगी सचिव संजीव लाल यांच्या नोकराच्या घरी ईडीने छापेमारी केली. यावेळी तब्बल २० कोटी रुपयांची रक्कम सापडली आहे. या २० कोटी रुपयांची मोजणी करण्याचे काम अधिकाऱ्यांकडून सुरु असून पैसे मोजण्यासाठी काही मशीन्स मागवण्यात आल्याची माहिती सांगितली जात आहे. मंत्र्याच्या खासगी सचिवाच्या नोकराच्या घरी एवढी मोठी रोकड सापडल्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

झारखंड ग्रामीण विकास विभागाच्या काही योजनांच्या अंमलबजावणीमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. यामध्ये मनी लॉड्रिंग प्रकरणाच्या संदर्भात ईडीकडून तब्बल छापेमारी करण्यात आली. तर याच प्रकरणात ग्रामीण विकास विभागाचे मुख्य अभियंता वीरेंद्र राम यांना २२ फेब्रुवारी २०२३ मध्ये अटक करण्यात आली होती. आताही वीरेंद्र राम यांच्या संबंधित काही ठिकाणी ईडीने छापेमारी केली आहे. आलमगीर आलम हे पाकूर विधानसभा मतदारसंघाचे कॉंग्रेसचे आमदार आहेत. तसेच सध्या ते झारखंड सरकारमध्ये त्यांच्याकडे ग्रामीण विकास मंत्रालयाची जबाबदारी आहे. तसेच २००६ ते २००९ या दरम्यान ते झारखंड विधानसभेचे अध्यक्षही होते. आलमगीर आलम हे चारवेळा आमदर म्हणून निवडून आलेले आहेत.

# दहशतवाद्यांविरोधात सुरक्षा दलांची मोहीम; पूंछ हल्ल्यासंबंधी अनेकांची चौकशी; वाहनांची तपासणी

■ मेंढर: वृत्तसंस्था

जम्मू- काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात भारतीय हवाई दलाच्या ताफ्यावर करण्यात आलेल्या हल्ल्यामागील दहशतवाद्यांच्या शोधासाठी हाती घेण्यात आलेली व्यापक मोहीम रविवारी दुसऱ्या दिवशीही सुरू होती. या संबंधात अनेक लोकांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

जम्मूचे अतिरिक्त पोलीस महासंचालक आनंद जैन, तसेच लष्कर आणि गुप्तवार्ता विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुरनकोट भागातील हल्लास्थळाला भेट दिली. लष्कराने हेलिकॉप्टरच्या साहाय्याने या भागाची हवाई टेहळणीही केली. शोधमोहिमेत लष्कराच्या पॅरा कमांडोंची पथकेही तैनात करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# राज्याचे भविष्य पालघरमध्येच; वाढवण बंदरामुळे १० लाख रोजगारनिर्मिती, 'जेएनपीए'च्या अध्यक्षांचा विश्वास

■ पालघर: सचिन कदम

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे (जेएनपीए) सध्या सुरू असणारा विस्तारीकरण प्रकल्प एप्रिल २०२५ मध्ये पूर्णपणे कार्यरत होणार आहे. वाढवण बंदराची उभारणी झाल्यास पुढील १० वर्षात १० लाख प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार असून महाराष्ट्राचे भविष्य पालघरमध्ये राहणार असल्याचे प्रतिपादन जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेश वाघ यांनी केले. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचा विस्तारीकरण प्रकल्प अंतिम टप्प्यात असून बंदरातील पद्धतींमधील कार्यक्षमता वाढवली तरी या बंदरात सध्या हाताळणी होणाऱ्या सुमारे साडेसहा दशलक्ष कंटेनरचे प्रमाण १० दशलक्षांपर्यंत पोहोचू शकेल अशी शक्यता आहे. अशा स्थितीत देशातील निर्यात व आयात क्षेत्रात होणारी वाढ व होणारा औद्योगिक विकास पाहता भविष्याच्या दृष्टिकोनातून वाढवण येथे बंदर उभारणी करणे आवश्यक झाल्याचे वाघ यांनी सांगितले. बंदराची आखणी करणे व संकल्पना करून प्रत्यक्ष उभारणी करण्याची प्रक्रिया ही सुमारे १० वर्षांची असल्याने या दृष्टीकोनातून बंदर उभारणीसाठी जोरदार प्रयत्न



सुरू असल्याचे ते म्हणाले. वाढवण येथील प्रस्तावित बंदराला पर्यावरण विभागाची मान्यता मिळाली असून सार्वजनिक गुंतवणूक मंडळाची मंजुरी अद्याप मिळालेली नाही. सध्या निवडणूक आचारसंहिता असल्याने मंत्रिमंडळाकडून परवानगी मिळू शकली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जेएनपीए येथे सध्या १५ मीटरची खोली प्राप्त असून त्या ठिकाणी १७ हजार कंटेनर क्षमता असणाऱ्या जहाजांची नांगरणी होणे शक्य होणार आहे. मात्र वाढवण येथे १८ ते २० मीटरची नैसर्गिक खोली प्राप्त असून २४ हजार कंटेनर क्षमतेपेक्षा अधिक जहाजांची बंदरात नांगरणी शक्य होणार असून त्यामुळे भारताची सिंगापूर, कोलंबो व इतर आंतरराष्ट्रीय बंदरांवरील अवलंबता संपुष्टात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. बंदर उभारणीला केंद्र सरकारची परवानगी मिळाल्यानंतर याच परिसरात अद्ययावत रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटरच्या उभारणी होणार आहे.

न्हावाशेवाच्या तुलनेत वाढवण येथे ४३ टक्के जागा उपलब्ध असल्याने जागेचा प्रभावी वापर करण्यासाठी बंदर प्रकल्प आखणी करण्यात आली आहे. निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर पालघर, डहाणू तालुक्यातील स्थानिकांसाठी कौशल्य प्रशिक्षणाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

# मुख्यमंत्री शिंदे यांचे बालेकिल्ल्यात शक्तिप्रदर्शन: नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी ठाण्यात 'रोड शो'

■ ठाणे: तृप्ती गोरे

ठाणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोपरी-पाचपाखाडी परिसरात जोरदार शक्तिप्रदर्शन केले. हा मुख्यमंत्र्यांचा विधानसभा मतदारसंघ असल्याने तेथून आपल्या पक्षाला सर्वाधिक मतदान व्हावे, हा त्यांचा प्रयत्न असून त्यासाठी त्यांनी मतदारांना साद घातली.



कोपरी-पाचपाखाडीमध्ये रविवारी संध्याकाळी म्हस्के यांच्या प्रचारफेरीचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही या प्रचारफेरीत सहभागी झाले. कोपरी-पाचपाखाडी परिसर हा आनंद दिघे यांचा बालेकिल्ला आहे. येथून तुम्ही मला निवडून दिले. त्यामुळे मी मुख्यमंत्री झालो. येत्या निवडणुकीत धनुष्यबाणाला मतदान कराल असा शब्द द्या, असे आवाहन शिंदे यांनी केले. तसेच ही निवडणूक केवळ ठाण्याची नाही, तर देशाच्या विकासाची निवडणूक आहे. आपल्या देशाला महासत्ता बनविणारी ही निवडणूक आहे. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवायचे आहे, असेही शिंदे म्हणाले. तुम्ही २४ तास काम करणाऱ्यांना निवडून द्याल की, घरात बसून फेसबुक लाईव्ह करणाऱ्यांना निवडून द्याल, असा टोलाही त्यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता लगावला. संपूर्ण ठाणे लोकसभा मतदारसंघात कोपरी पाचपाखाडीमधून सर्वाधिक मतदान झाले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

# ठाण्यात महायुतीच्या प्रचाराची रणनिती ठरवणार समन्वयक, १५० प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समन्वयक चमूत समावेश

■ ठाणे: प्रतिनिधी

ठाणे लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर महाविकास आघाडीने मतदार संघात प्रचार यात्रा काढली असून त्यापाठोपाठ आता महायुतीनेही पदाधिकाऱ्यांच्या बैठकांचा सपाटा लावत ६ विधानसभा क्षेत्रातील विविध मित्र पक्षांच्या १५० प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समन्वयक चमू तयार केला आहे. या समन्वयकामार्फत प्रचाराच्या नियोजनाची रणनिती आखली जाणार आहे.




ठाणे लोकसभा मतदार संघामध्ये उबाठा गटाचे उमेदवार राजन विचारे आणि शिंदेच्या शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज नुकतेच दाखल केले. या दोन्ही उमेदवारांच्या प्रचारासाठी महायुती आणि महाविकास आघाडीने आता कंबर कसली असून युती आणि आघाडीकडून उमेदवारांच्या विजयासाठी प्रचाराची रणनिती ठरविण्यास सुरूवात केली आहे. या रणनितीचा एक भाग म्हणून उबाठा गटाचे उमेदवार राजन विचारे यांनी मुख्यमंत्र्यांच्या कोपरी-पाचपखाडी मतदार संघातून शनिवारी प्रचार यात्रा काढली. तर, नरेश म्हस्के यांच्या विजयासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी बैठका घेऊन मोर्चेबांधणी केली. त्यापाठोपाठ शनिवारी दुपारी ठाण्यातील भाजपच्या मुख्यालयात महायुतीच्या नेत्यांची एक बैठक पार पडली. यामध्ये ठाणे, कोपरी-पाचपाखाडी, ओवळा-माजिवडा, मीरा भाईदर, ऐरोली, बेलापूर या ६ विधानसभा क्षेत्रातील शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी कॉंग्रेस, मनसे, रिपाइं व मित्र पक्षांचे प्रमुख १५० पदाधिकारी उपस्थित होते. या पदाधिकाऱ्यांचा समन्वयक चामूमध्ये समावेश करण्यात आला असून ते प्रचाराची दिशा, जाहीर सभा, प्रचार साहित्य यांचे नियोजन करणार आहे. नरेश म्हस्के यांनीही बैठकीला उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

या समन्वयकांचा व्हाट्सॲप समुह तयार करण्यात आला असून मतदानापर्यंत समन्वयकांनी सुट्टी घेऊ नये, सकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रचार करावा, दुपारी १ ते ४ मान्यवरांच्या बैठका घ्याव्या, बूथ स्तरावर आणि मतदार यादीवर काम करा, अशा सुचना महायुतीच्या नेत्यांनी समन्वयकांना बैठकीत दिल्या.

# सोलापुरात कचरा आगारापाठोपाठ स्मार्ट सिटीच्या पाईप साठ्यालाही मोठी आग

■ सोलापूर: माधव अलवा

सोलापूर महापालिकेच्या कचरा आगारासह स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी लागणाऱ्या केबल पाईपच्या साठ्याला भीषण आग लागण्याच्या दोन घटना घडल्या असून कचरा आगारातील आग आटोक्यात येण्यासाठी आता मोठ्या पावसाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. तर केबल पाईपचा संपूर्ण साठा जळून लाखोंची हानी झाली आहे.

तुळजापूर रस्त्यावर सुमारे ५४ एकर परिसरात महापालिकेचा कचरा आगार आहे. तेथे दरवर्षी उन्हाळ्यात वाढत्या उष्म्यामुळे आग लागते. लागलेली आग महिन्यापेक्षा जास्त दिवसांपर्यंत नियंत्रणात येत नाही. शुक्रवारी सायंकाळी लागलेली आग सुमारे ३० एकर परिसरातील कचऱ्याला लपेटली आहे. तुळजापूर रोडसह हगलूर, शेळगी, दहिटणे, भवानी पेठ मड्डी वस्ती आदी भागात दूरपर्यंत आगीचे उंच लोळ दिसत होते. विषारी आणि दुर्गंधीसह पाच किलोमीटरपेक्षा जास्त परिसरात विषारी आणि दुर्गंधीयुक्त धुरामुळे तेथील जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिका प्रशासनाने दोन वर्षापूर्वी या कचरा आगारामध्ये कचऱ्याचे विलगीकरण करून स्वतंत्र जैव खाण करण्याचे





काम हाती घेतले होते. परंतु आतापर्यंत निम्मेही काम झाले नाही. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या सांगण्यानुसार कचरा आगारात दररोज चारशे टन कचरा साचतो. दिवसेंदिवस कचरा साचण्याचे प्रमाण वाढत असल्यामुळे कचरा विलगीकरणात अडचणी येतात. दरम्यान, आगीच्या घटनेची माहिती मिळताच महापालिका अग्निशमन यंत्रणा कचरा आगाराकडे धावून गेली. २४ तासांत ३५ पेक्षा जास्त पाण्याचे बंब वापरून तसेच फोम रसायनाचा फवारा करूनही आग आटोक्यात येणे आवाक्याबाहेर झाल्याचे पालिका अग्निशमन विभागाचे अधीक्षक केदारनाथ आवटे यांनी सांगितले. ही आग आटोक्यात येण्यासाठी आता पावसाची प्रतीक्षा करावी लागणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

एकीकडे कचरा आगाराला लागलेल्या आगीने रौद्र रूप धारण केले असताना तेथून जवळच भोगाव येथे उघड्या मैदानावर ठेवलेल्या स्मार्ट सिटी प्रकल्पाशी संबंधित केबर पाईपचा मोठा साठा शनिवारी दुपारी अचानकपणे लागलेल्या आगीत जळून खाक झाला. हा केबल पाईपचा साठा यापूर्वी होम मैदानावर साठविण्यात आला होता.

# आई-वडिलांनी मुलगी, नातवाच्या साथीने केला त्रास देणाऱ्या मद्यपी मुलाचा निर्घृण खून, माण तालुक्यातील धक्कादायक घटना

■ **कराड: विशेष प्रतिनिधी**

दारू पिऊन घरच्यांना वारंवार घाणेरडे बोलणे, शिव्या देणे व वहिनीवर वाईट नजर ठेवून चारित्र्यावर संशय घेणाऱ्या आणि दारूला पैसे देत नाहीत म्हणून आई-वडिलांना मारहाण करून, पुतण्याला आणि वहिनीला मारून टाकण्याची धमकी देणाऱ्या पोटच्या मुलीच्या त्रासाला कंटाळून आई-वडिलांनी मुलगी व नातवाच्या साथीने त्याचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना माण तालुक्यातील शिरवली येथे घडली. दहिवडी पोलिसांनी केवळ दोनच तासात गुन्ह्याचा छडा लावला. दादा रामचंद्र जगदाळे असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. शिरवली गावाच्या यात्रेनिमित्त घरी आलेली मयताची बहीण, मयताचा अल्पवयीन पुतण्या यांच्यासोबत मयताच्या आई-वडिलांनी मयत दादा जगदाळे हा दारू पिऊन घरी येऊन झोपल्यानंतर त्याच्या डोक्यात दगड घालून हातपाय पकडुन दोरीने गळा आवळून त्याचा खून केला.

दहिवडी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होत अज्ञाताविरोधात खूनाचा गुन्हा दाखल केला होता. या खुनाचा छडा लावण्याचे पोलिसांसमोर आव्हान असतानाच सहाय्यक पोलीस




निरीक्षक अक्षय सोनवणे यांनी तपासाची चक्रे गतिमान करत अवघ्या दोन तासात संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे.

पोलीसांनी दिलेली माहिती अशी की, रात्रीच्या वेळी कुत्रांच्या भूकण्याने वडील घराबाहेर आले. त्यावेळी त्यांना आपला मुलगा रक्तबंबाळ अवस्थेत दिसला. त्यावेळी तिथून चार ते पाच लोक पळून गेले असल्याचे सांगत संबंधित संशयितांनी खुनाचा बनाव रचला. त्यामुळे त्यांचे सांगणे व घटनास्थळाची परिस्थिती यामध्ये मोठी तफावत असल्याचा पोलिसांचा संशय बळावला. यावर सपोनि अक्षय सोनवणे यांच्यासह पोलिसांनी घरात जाऊन पाहणी केली असता, मयताचा मोबाईल घरात होता. एकंदरीत प्रकार बघून पोलिसांनी संबंधितांवर प्रश्नांची सरबत्ती करत पोलिसीखाक्या दाखवताच नेमकी वस्तुस्थिती समोर आली. खून तरुण हा दारू पिऊन घरच्यांना वारंवार घाणेरडे बोलणे, शिव्या देणे व मयताची वहिनी वर वाईट नजर ठेवून चारित्र्यावर संशय घेत होता. दारूला पैसे देत नाहीत म्हणून आई-वडिलांना मारहाण करून पुतण्याला आणि वहिनीला मारून टाकण्याची धमकी देत होता, त्यामुळे सततच्या या त्रासाला कंटाळून शिरवली यात्रेनिमित्त घरी आलेली मयताची बहीण, मयताचा अल्पवयीन पुतण्या यांच्यासोबत मयताच्या आई-वडिलांनी आपला मद्यपी मुलगा दादा रामचंद्र जगदाळे हा दारू पिऊन घरी येऊन झोपल्यानंतर त्याच्या डोक्यात दगड घालून हातपाय पकडुन दोरीने गळा आवळून त्याचा खून केला.

# पोलिसाच्या मृत्यूचे गूढ, मोबाइलची चोरी; विषारी इंजेक्शनची माहिती खोटी

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

पोलीस शिपाई विशाल पवार यांच्या मृत्यूचे गूढ आणखी वाढले आहे. पवार यांच्या हाताला फटका मारून त्यांच्या मोबाइलची चोरी आणि चोरट्यांकडून विषारी इंजेक्शन दिल्याबाबतचे कोणतेही पुरावे तपासात सापडले नाहीत. तसेच माटुंगा व शीव रेल्वे स्थानकांदरम्यान असा कुठलाही प्रकार घडला नसल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. याशिवाय दादर व ठाणे येथील सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणात पोलीस शिपाई विशाल पवार दिसले. त्यामुळे पवार यांनी मृत्यूपूर्वी दिलेल्या माहितीत तथ्य नसल्याचे आढळून आले आहे. रेल्वे पोलीस दलातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी पवार कामावर गेलेच नाहीत. दादर व ठाणे येथील दोन बारजवळील सीसी टीव्ही कॅमेऱ्यामध्ये पवार दिसले. त्यामुळे कोपरी येथे रुग्णालयात पवार यांनी दिलेली माहिती खोटी असल्याचे निष्पन्न झाले आहे. पण त्यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, ते अद्याप स्पष्ट झालेले नाही. तपास पथकाने



ठाणे- भायखळादरम्यानचे घटनेच्या दिवसाचे सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील सर्व चित्रण तपासले. त्यात पवार यांनी शनिवारी ठाण्यावरून सीएसएमटी लोकल पकडली. पण भायखळ्याला उतरण्याऐवजी ते दादरला उतरले. पवार दादर रेल्वे स्थानकाच्या बाहेर रात्री १२ च्या सुमारास दिसले. यावेळी त्यांनी दादर येथून मोबाइलवरून चुलत भावाशी संपर्क साधला होता. तेथून ते दोन किलोमीटर चालत परळला गेले. तेथील स्थानकावर संपूर्ण रात्र ते झोपले होते. त्यानंतर ते परळ येथून माटुंग्याला लोकलने गेले. तेथे काही वेळ घालवल्यानंतर त्यांनी लोकलने ठाणे स्थानक गाठले. त्यानंतर त्यांनी एका नातेवाईकाला ठाण्याजवळ बोलावले. घरी सकाळी साडेअकराला पोहोचल्यानंतर त्यांना उलट्या झाल्या. त्यामुळे मृत्यूपूर्वी विशाल पवार यांनी दिलेली माहिती व तपासात निष्पन्न झालेली माहिती यात तफावत आढळून आली आहे. त्यामुळे शवविच्छेदन अहवालातून पवार यांच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होऊ शकेल.

# सोन्याच्या तस्करीप्रकरणी वर्षभरानंतर आरोपीला अटक

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

सोने तस्करीप्रकरणी वर्षभरानंतर एकाला अटक करण्यात महसूल गुप्तचर संचालनायाला (डीआरआय) यश आले आहे. याच गुन्ह्यांत यापूर्वी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून या अधिकाऱ्यांनी सुमारे सव्वादोन कोटींचे सोने जप्त केले होते. दुबईहून सोने तस्करी करणाऱ्या काही टोळ्या सक्रिय



आहेत. त्या टोळ्या विविध मार्गाने दुबईतून सोने आणून त्याची भारतीय बाजारात विक्री करतात. त्यांना रोखण्यासाठी डीआरआयने सापळा रचला होता. गेल्या वर्षी मे महिन्यांत दुबईहून कोट्यवधी रुपयांच्या सोन्याची तस्करी होणार असल्याची माहिती डीआरआयच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्या माहितीनंतर या अधिकाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय विमानतळावर दुबईहून येणाऱ्या प्रत्येक प्रवाशासह त्यांच्या सामानाची झडती सुरु केली होती. त्यावेळी दुबईहून आलेल्या दोन प्रवाशांना या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले. त्यांच्या बॅगेतून सुमारे सव्वादोन कोटींचे सोने डीआरआयने जप्त केले होते. गोल्ड तस्करीप्रकरणी नंतर दोन्ही प्रवाशांना अटक करण्यात आली होती. त्यांच्या चौकशीत नरेश देवूरकर याचा सहभाग असल्याचे उघडकीस आले होते. मात्र त्या दोघांच्या अटकेनंतर तो पळून गेला होता. तोच त्याच्या इतर सहकाऱ्यांच्या मदतीने दुबईतून सोन्याची तस्करी करत होता.

# वीज बिलाच्या वादातून घरमालकाचा खून, आरोपी भाडेकरूला पोलिसांकडून अटक

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

वीज बिल भरण्यावरून झालेल्या वादातून भाडेकरूने घरमालकाचा हातोड्याने खून केला. गोवंडी येथे ही घटना घडली. मारहाणीत गंभीर जखमी



झालेल्या घरमालकाचा राहत्या घरात मृत्यू झाला. दोन दिवसांनंतर घरातून दुर्गंधी येऊ लागल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी ६३ वर्षीय आरोपीला शिवाजी नगर पोलिसांनी अटक केली.

गणपती झा (४९) असे मृत व्यक्तीचे नाव असून ते बैंगनवाडी परिसरात रहायचे. गुरूवारी बैंगनवाडी येथे त्यांच्या राहत्या घरातून दुर्गंधी येत असल्यामुळे स्थानिकांनी पोलिसांना याबाबतची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता झा याचा दोन दिवसांपूर्वीच मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानंतर मृत व्यक्तीचा चुलत भाऊ दिनेश झा याने परिसरात चौकशी केली असता वीज बिलाच्या वादातून त्याचे भाडेकरू अब्दुल शेख (६३) याच्यासोबत भांडण झाले होते. त्या वादातून शेखने लांगडी दांडक्याने व हातोड्याने गणपतीला मारहाण केल्याचे स्थानिकांनी सांगितले. त्यानुसार दिनेश झा याने याबाबत शिवाजी नगर पोलिसांकडे तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून अब्दुल शेखला अटक केली. ३० एप्रिलला वीज बिलावरून गणपती व अब्दुल शेख यांच्यात वाद झाला होता. त्यातून गणपतीने शेखला शिवीगाळ केली. त्या रागातून शेखने जिन्यावर चढून गणपतीला लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्याचा प्रतिकार केला असता आरोपीने कमरेला लावलेली हाताडी काढली व गणपतीच्या तोंडावर मारली. त्यावर गणपती गंभीर जखमी झाला होता. तो आपल्या घरी गेला. त्यानंतर दोन दिवसांनंतर राहत्या घरात तो मृतावस्थेत सापडला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# युवतीच्या आत्महत्येस कारण असलेल्या दोन युवकांच्या विरोधात सहा महिन्यांनी गुन्हा दाखल

■ **नवी मुंबई: विशेष प्रतिनिधी**

कोपरखैरणेत एका युवतीने आत्महत्या केल्याचा प्रकार डिसेंबर महिन्यात घडला होता. मात्र तिच्या परिचित युवकाने दिलेल्या मानसिक त्रासामुळे तिने आत्महत्या केली असा दावा तिच्या पालकांनी केला होता. याबाबत काही ठोस पुरावे सादर करूनही त्या युवकांच्या विरोधात गुन्हा दाखल केला जात नव्हता अखेर आयुक्तांच्या पर्यंत प्रकरण गेल्यावर मात्र आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी दोन युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यश जाधव आणि हर्ष जाधव असे यातील आरोपींची नावे आहेत. कोपरखैरणे येथे राहणाऱ्या एका १८ वर्षीय युवतीला आत्महत्या करण्यास भाग पाडले म्हणून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आत्महत्या करणारी युवती आणि आरोपी हे एकमेकांच्या परिचित होते. त्यातून आरोपीचे एकतर्फी युवतीवर प्रेम होते. मात्र युवती शिक्षणाला महत्व



देत शिकत होती. दरम्यान त्या युवकाने तिला मानसिक त्रास देणे सुरु केले. त्यात इन्स्टाग्रामवर शारीरिक सुखाची मागणी यश जाधव याने केली . तसेच युवतीच्या आई विषयी अश्लील भाषेत संदेश टाकला. या मानसिक धक्यातून ती सावरत नाही तोच तिच्या घराजवळ राहणाऱ्या हर्ष जाधव याने तिच्याशी भांडण उकरून काढले. या सर्व प्रकरणाने वैतागून सदर युवतीने ३० नोव्हेंबरच्या रात्री राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. तिचे वडील हे मुंबईतच कामाच्या ठिकाणी राहत होते तर आई आजारी म्हणून गावी सांगली येथे राहत होती. हि बातमी कळताच त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. युवतीचा मृतदेह घेऊन ते गावी गेले व अंत्यसंस्कार करून काही दिवसांनी पुन्हा नवी मुंबईत आले. या धक्यातून सावरत असताना तिच्या मोबाईल मध्ये आरोपींनी केलेला प्रकार व आसालाच्या लोकांच्या सांगण्यातून झालेले भांडण यांबाबत त्यांना कळले. याबाबत पोलिसांना माहिती पालकांनी दिली. त्यानंतर हालचाल करीत पोलिसांनी आरोपींच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# पालममध्ये गळा दाबून मुलीचा खून: दहा दिवसानंतर 'ऑनर किलिंग'ची घटना उघडकीस

■ **परभणी: विशेष प्रतिनिधी**

आंतरजातीय प्रियकराशी विवाह करणाऱ्या मुलीचा गळा दाबून खून करण्यात आला. ही घटना पालम तालुक्यातील नाव्हा येथे २१ ते २२ एप्रिल दरम्यान घडली. तब्बल दहा ते बारा



दिवसानंतर हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी मृत मुलीचे वडील बालासाहेब भीमराव बाबर, आई रुखमीनबाई बालासाहेब बाबर, अच्यूत दत्तराव बाबर, राजेभाऊ रखमाजी बाबर, अशोक रूस्तूमराव बाबर, आबासाहेब रूस्तूमराव बाबर, गंगाधर योगाजी बाबर, गोपाळ अशोक बाबर यांच्याविरूद्ध शुक्रवारी पालम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नाव्हा येथील १९ वर्षीय मुलीचे गावातील एका तरुणासोबत प्रेम होते. पण मुलीचा प्रियकर आंतरजातीय असल्याने त्याच्याशी विवाह करू नये असा दबाव टाकत मुलींच्या आई वडिलांनी विरोध केला. तरीही मुलगी प्रियकरासोबत आंतरजातीय विवाह करण्यावर ठाम होती. त्यामुळे घरात झोपलेल्या मुलीची २१ एप्रिल रोजी रात्री गळा दाबून हत्या करण्यात आली. त्यानंतर कोणालाही थांगपत्ता लागणार नाही, यासाठी रात्री भावकीतील निवडक लोकांच्या उपस्थितीत मृत मुलीचे प्रेत जाळून टाकत पुरावा नष्ट करण्यात आला . या अंत्यविधीला उपस्थित असणाऱ्या लोकांना घटनेची माहिती होती. तरीही पोलिसांना या घटनेची कल्पना देण्याचे जाणीवपूर्वक टाळले आणि अपराधास सहाय्य केल्याप्रकरणी वरील आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तपास उपविभागीय पोलिस अधिकारी समाधान पाटील करीत आहेत. तपासासाठी न्यायवैद्यक शास्त्र विभाग, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, पालम पोलिसांचे पथके घटनास्थळी असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

# बारा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार, आरोपी पित्याला अटक

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

गोरेगाव येथे बारा वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी सावत्र पित्याला पोलिसांनी शनिवारी अटक केली. आरोपीविरोधात बलात्कार व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सत्तावीस वर्षीय




आरोपी बेरोजगार असून त्याची पत्नी कामाला जाते. शनिवारी आरोपीची पत्नी कामाला गेली असता त्याने राहत्या घरी सावत्र मुलीवर अत्याचार केला. आई परत आल्यानंतर पीडित मुलीने हा प्रकार आईला सांगितला. त्यानंतर महिलेने तत्काळ याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी बलात्कार व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्या अंतर्गत शनिवारी रात्री गुन्हा दाखल केला. त्यानंतर शनिवारी मध्यरात्री आरोपी पित्याला पोलिसांनी अटक केली.

# कल्याण जवळील नेवाळी गावातील किराणा दुकानात सापडले साडेचार कोटींचे अमली पदार्थ

■ **डोंबिवली: विशेष प्रतिनिधी**

अंबरनाथ तालुक्यातील मलंगड भागात नेवाळी गावातील एका किराणा दुकानावर छापा टाकून कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने साडेचार कोटी रुपये किमतीचा तीन किलो वजनाचा मॅफोड्रोन नावाच्या अंमली पदार्थाचा साठा शुक्रवारी हस्तगत केला. या प्रकरणी हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून राजेश कुमार प्रेमचंद तिवारी याला अटक करण्यात आली आहे. त्याचा साथीदार शैलेंद्र अहिरवार हा फरार झाला आहे. त्याचा पोलीस शोध घेत आहेत.

या तस्करांनी अंमली पदार्थाचा साठा कुठून आणला. हे अंमली पदार्थ ते कुणाला विकत होते. या रॅकेटमध्ये किती जणांचा सहभाग आहे. याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. गेल्या काही महिन्यांपासून कल्याण-डोंबिवली परिसरात अंमली पदार्थांची तस्करी वाढत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. पोलीस तस्करांच्या मागावर होते. काटई-बदलापूर पाईपलाईन छेद रस्त्यावरील कल्याण-मलंगगड रोडला असलेल्या नेवाळी गावात गायत्री किराणा दुकानामध्ये अंमली पदार्थाचा मोठा साठा दडवून गुप्त पद्धतीने विक्री करण्यात येत असल्याची माहिती कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांना गुप्तहेरांकडून मिळाली होती. नरेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली २०



अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक शुक्रवारी नेवाळी गावातील गायत्री किराणा दुकानात अचानक घुसले. दुकानाची झडती घेताना पथकाच्या हाती दुकानात ३ किलो ४ ग्रॅम वजनाचा मॅफोड्रोनचा साठा आढळून आला. पथकाने दुकानाचा चालक राजेश कुमार तिवारी याला अटक केली. राजेश हा कटाई-बदलापूर पाईपलाईन रोडला असलेल्या धामटण गावातील एकविरा ढाब्याजवळ राहतो. राजेशचा साथीदार शैलेंद्र अहिरवार हा कारवाईनंतर फरार झाला आहे. शैलेंद्र अहिरराव हा ठाण्यातील ढोकळी-कोलशेत परिसरात राहतो. त्याचा शोध पोलीस घेत आहेत. राजेश तिवारी आणि शैलेंद्र अहिरराव हे दोघेही अंमली पदार्थांच्या विक्री व्यवसायात कार्यरत आहेत. त्यांच्या निकटवर्तीयांचाही उत्तरप्रदेशसह महाराष्ट्रातही अंमली पदार्थांचा व्यवसाय सुरू आहे. किराणा दुकानाच्या नावाखाली राजेश तिवारी याच्या अंमली पदार्थांच्या विक्रीचा धंदा जोरात सुरु होता. या साठ्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत ४.५० कोटी आहे. डोंबिवली एमआयडीसीतील काही किराणा दुकानांच्या समोर दिवसभर तरुण-तरुणींची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. अशी ठिकाणे शोधून पोलिसांनी तेथेही कारवाई सुरू करावी अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे. एमआयडीसीतील एका प्रसिद्ध रुग्णालय समोरील गल्लीत हा प्रकार मागील अनेक महिन्यांपासून सुरू असल्याच्या तक्रारी आहेत.

# ‘अनोळखी नंबरहून फोन आला अन् म्हणाला तुझ्या बाबांना...’ बंगळुरूतील महिलेने सांगितली ऑनलाइन फसवणुकीची नवी पद्धत

■ **बंगळुरू: विशेष प्रतिनिधी**

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात अनेक कामे चुटकीसरशी हातावेगळी करता येतात. सर्व काही ऑनलाइन उपलब्ध असल्यामुळे आपली सगळी कामे सोपी झाली आहेत. मात्र, याच इंटरनेट, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून लोकांची ऑनलाइन फसवणूकही केली जाते. यासाठी सायबर गुन्हेगारांकडून विविध पद्धतींचा वापर केला जातो. अशीच एक नवीन पद्धत आता पुढे आली आहे. बंगळुरूतील एका महिलेसोबत हा प्रकार घडला आहे. बंगळुरूतील एका महिलेने एक्स या समाजमाध्यमावर पोस्ट करत तिच्याबरोबर घडलेला प्रकार



सांगितला आहे. तसेच नागरिकांनी सावध राहावे, असा सल्ला देखील तिने दिला आहे. ती म्हणाली, ‘काही दिवसांपूर्वी मी ऑफीसमध्ये काम करत असताना मला एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. ‘आदिती बेटा, मला तुझ्या बाबांना पैसे पाठवायचे आहेत. मात्र, काही तांत्रिक कारणांमुळे ते शक्य होत नाहीये. तुला पाठवले तर चालतील का?’ असे त्याने मला विचारले. तसेच त्याने माझा नंबर दाखवून खातरजमाही केली. त्यानंतर मी त्यांना हो म्हणून सांगितले.’

पुढे ती म्हणाली, ‘कॉल संपल्यानंतर काही मिनिटातच माझ्या खात्यात आधी १० हजार आणि नंतर ३० हजार रुपये जमा झाल्याचा मेसेज आला. त्यानंतर त्या व्यक्तीने पुन्हा कॉल करून सांगितले, की ‘मला तुझ्या वडीलांना ३ हजार पाठवायचे होते, मात्र मी चुकून ३० हजार पाठवले, बाकी पैसे परत करते का? मी दवाखान्यात उभा आहे, मला डॉक्टरला पैसे द्यायचे आहेत.’ एकूण हा प्रकार संशयास्पद असल्याचे लक्षात येताच मी माझ्या मोबाईलवर आलेले मेसेज बघितले तेव्हा ते मेसेज बॅंकेच्या नंबरवरून न येता, एका अनोळखी नंबरवरून आले होते.

# परदेशात नोकरीच्या आमिषाने दिडशे तरुणांची फसवणूक, नवघर पोलिसांकडून टोळीतील तिघांना अटक

■ **भाईंदर: विशेष प्रतिनिधी**

शेकडो तरुणांना परदेशात नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीतील ३ आरोपींना नवघर पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपींकडून ६ लाख रुपयांचा मुद्देमाल तसेच १४९ पारपत्र जप्त करण्यात आले आहेत. भाईंदर पूर्व येथील ईगल प्लेसमेंट सर्व्हिसेस कार्यालयाकडून ऑनलाईन तरुणांना परदेशात नोकरी देण्याचे प्रलोभन दाखविण्यात आले होते. यात प्रत्येकाकडून कंपनीने काम करण्यासाठी ७० हजार रुपये घेतले होते. या सर्वांना विमानाची तिकिटे व व्हीजाही देण्यात आले होते. मात्र त्यांचे पासपोर्ट घेऊन कंपनी मालक फरार झाले. याबाबत काही तरुणांनी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दखल केल्यानंतर हे प्रकरण उजेडात आले. दिडशेहून अधिक तरुणांची फसवणूक झाल्याचे तपासात समोर आले. नवघर



पोलिसांनी या प्रकरणी तपास करून अबरार अहमद मुक्तार शाह, वसीम शाह आणि मोहम्मद सिद्धीकी यांना अटक केली. या टोळीतील अजून तीन आरोपी फरार आहेत. आरोपींकडून ६ लाखांचा मुद्देमाला आणि १४९ पारपत्र जप्त केल्याची माहिती उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली आहे. या टोळीने कुणालाही परदेशात पाठवलेले नव्हते. भाईंदर प्रमाणेच मुंबई, दिल्ली आणि कोलकत्ता राज्यात अशा प्रकारचे कार्यालय थाटून तरुणांची फसवणूक करण्याची त्यांची योजना होती. नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी, पोलीस निरीक्षक अशोक कांबळे (गुन्हे) सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पालवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल तळेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल धायगुडे, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर आसबे आदींच्या पथकाने कारवाई करून या टोळीला अटक केली.

# महापालिकेच्या भरकटलेल्या कारभाराला दिशा देण्याची वेळ



■ मुंबई: यश सावंत

**मुंबईकरांच्या उत्तम भविष्यासाठी दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण रस्ते उपलब्ध व्हावेत यासाठी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी महापालिकेच्या अभियंत्यांसाठी आयआयटी संस्थेच्या माध्यमातून विचारमंथन कार्यशाळा आयोजित केली होती. या एकदिवशीय कार्यशाळेत महापालिकेच्या अभियंत्यांना सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामात येणाऱ्या विविध समस्या आदींबाबत आयआयटीच्या प्राध्यापकांनी मार्गदर्शन केलं.**

खारंतर आयआयटी, व्ही.जे.टी. आय.या संस्थांचे मार्गदर्शन लाभणं हे आवश्यकच होतं. ते महापालिका आयुक्तांनी आपल्या अभियंत्यांना उपलब्ध करून दिलं. आयआयटीसारख्या संस्थांचे मार्गदर्शन महापालिकेच्या अभियंत्यांना लाभले यात काहीही वावगे नाही, पण त्याबरोबरच आपल्याच निवृत्त अभियंत्यांमार्फत मार्गदर्शन लाभले असते तर तांत्रिक आणि भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास यावर आधारीत परिपूर्ण मार्गदर्शन ठरले असते. महापालिकेचे निवृत्त अभियंते डी. डी. नाईक तसेच विद्यमान रस्ते विभागाचे अभियंते विशाल ठोंबरे यांनी या रस्ते कामांवर पीएचडी केलेली आहे. महापालिकेत (ँण) संजय दराडे, विनोद चिठोरे, डी.एल. शिंदे, तांबे असे अनेक रस्ते प्रमुख अभियंता निवृत्त झाले आहेत, त्यांचे मार्गदर्शन महापालिकेत नव्याने रुजू झालेल्या अभियंत्यांना खऱ्या अर्थाने मार्गदर्शक ठरु शकतं. आयआयटीच्या तांत्रिक ज्ञानाबरोबरच रस्त्यांची कामे करताना येणाऱ्या समस्यांवर कशाप्रकारे मात करता येवू शकते याचे ज्ञान जर निवृत्त अधिकाऱ्यांमार्फत लाभले तर खऱ्या अर्थाने रस्ते विभागातील कनिष्ठ, दुय्यम तसेच सहायक अभियंत्यांच्या पदरी अनुभवाची शिदोरी बांधता येवू शकते. मुंबईत २०१७ पर्यंत एकूण १९४१.१६ कि.मी लांबीचे रस्ते होते. त्यामुळे १९८९ पासून टिकावू आणि दर्जेदार रस्ते बनवण्यासाठी मुंबई महापालिकेने (ँण) पुढाकार घेतला. १९८९ पासून २०१७ पर्यंत सुमारे ६५१ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे सिमेंटीकरण करता आले होते. म्हणजे २८ वर्षात केवळ ६५१ कि. मी. रस्त्यांची कामे होऊ शकली होती. म्हणजे वर्षाला सरासरी २३ कि.मी लांबीचे सिमेंट काँक्रिटची कामे होऊ शकली. परंतु २०२३ मध्ये मुंबईतील रस्त्यांची एकूण लांबी २०५० पर्यंत पाहोचली. म्हणजे सुमारे १०० किलोमीटर लांबीचे रस्ते वाढले. पण २००७ ते २०२३ या सहा वर्षाच्या कालावधीत तब्बल ३०० किलोमीटर रस्त्यांचे सिमेंटीकरण पार पडले. म्हणजे या सहा वर्षाच्या कालावधीत प्रति वर्षी सरासरी ५० किलोमीटर लांबीचे रस्ते सिमेंटीकरण् करण्यात आले. त्यामुळे सध्या मुंबईतील एकूण २०५० कि.मी.लांबीच्या रस्त्यांपैकी सुमारे १००० किमी लांबीच्या रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्यात आले. आता उर्वरीत रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरणाची कामे पहिल्या टप्प्यात ४०० किमी आणि दुसऱ्या टप्प्यात ४०० किमी लांबीची कामे हाती घेत मुंबईतील सर्व रस्ते खड्डेमुक्त बनवण्याचा निर्धार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वीचे आयुक्त इक्बालसिंह चहल आणि विद्यमान महापालिका आयुक्त भुषण गगराणी यांनी केला आहे. सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांचे सरासरी आयुर्मान हे ३० ते ३५ वर्षे असते. परंतु आपण मुंबईतील रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्यासाठी १९८९ पासून सुरुवात केली. आज ३५ वर्षे पूर्ण होत आली तरी संपूर्ण मुंबईतील सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांची परिक्रमा पूर्ण होऊ शकलेली नाही. उलट यापूर्वी केलेले सिमेंट काँक्रिटचे रस्ते पुन्हा तोडून नवीन बांधले जात आहेत. परंतु सीसी रोड बांधताना पूर्वीपेक्षा काम हे निकृष्ट दर्जाचे बनलेले आहे.

## शरद पवार २० दिवस फिरफिर फिरले, केवळ ४ तासांची झोप, रोहित पवारांनी दिली प्रकृतीची अपडेट

■ पुणे: अकिल शेख

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे आजचे सर्वच कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. गेल्या २० दिवसांपासून ते प्रचाराच्या कामात स्वत:ला झोकून देऊन काम करत होते. तर, राज्यातील बहुतांश जिल्ह्यात त्यांनी जाहीर सभांमधून जनतेला संबोधित केलं आहे. त्यामुळे, त्यांच घसा बसला असून प्रकृती अस्वास्थेमुळे त्यांना आरामाचा सल्ला देण्यात आला आहे.

आता, त्यांच्या प्रकृतीबद्दल माहिती देण्यात आली असून त्यांची प्रकृती स्थीर असल्याचं आमदार रोहित पवार यांनी सांगितलं आहे. दरम्यान, त्यांचे आज बीडमधील दौरेही रद्द करण्यात आले आहेत. त्यानंतर, बीडमधील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी फेसबुक पोस्ट






लिहून शरद पवारांना तब्येतीला जपा असे आवाहन केलंय. लोकसभा निवडणुकांची घोषणा झाल्यापासून शरद पवार बैठका आणि सभांच्या नियोजनात व्यस्त होते. विशेष म्हणजे महाविकास आघाडीची मोट बांधताना अनेकदा बैठकांसाठी तेच केंद्रबिंदू राहिले आहेत. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांसोबत त्यांचे सलोख्याचे संबंध असल्याने काँग्रेसची समजूत घालण्याचं किंवा महाविकास आघाडीत सुवर्णमध्य साधण्याचं कामही शरद पवारांनीच केलं आहे. तर, लोकसभा निवडणुकांच्या उमेदवारांच्या प्रचारसाठी ते पहिल्या टप्प्यापासून कामाला लागले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर ते अधिक सक्रीय झाले असून अजित पवारांच्या राष्ट्रवादीला टक्कर देण्यासाठी स्वत: लोकसभेच्या मैदानात उतरल्याचं पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी अहमदनगर जिल्ह्यात निलेश लंके यांच्या प्रचारासाठी आल्यानंतर त्यांनी आपला घसा बसल्याचे सांगितले होते. मात्र, तरीही प्रचारसभा घेत त्यांनी पुढेही अनेक ठिकाणी सभा केल्या आहेत. या निवडणूक दौऱ्यांचा व सभांचा ताण पडल्याने त्यांची प्रकृती अस्वस्थ झाल्याने त्यांना आरामाची गरज असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं आहे.

## ICICI होम फायनान्सच्या कार्यालयावर दरोडा, २२२ खातेदारांच्या लॉकरमधून ५ कोटींचे दागिने लंपास

■ नाशिक: संजीनी खाडे

नाशिकच्या आयसी आयसीआय होम फायनान्स या कंपनीच्या कार्यालयातील तब्बल पाच कोटींचे दागिने चोरट्यांनी लांबवल्याची घटना घडली आहे. या घटनेने नाशिकमध्ये एकच






खळबळ उडाली आहे. नाशिक शहरातील उच्चभ्रू वस्ती समजली जाणाऱ्या गंगापूर रोड परिसरात ही धाडसी चोरी झाल्यामुळे आता नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या चोरीनंतर आता नाशिक शहरातील गुन्हेगारी पुन्हा वाढली असून शहर पोलिसांवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नाशिक मधील डोंगरे वस्तीगृह मैदान परिसरात आयसीआयसीआय होम फायनान्स या संस्थेचे कार्यालय असून या ठिकाणी नेहमीच वाहनांची आणि लोकांची वर्दळ असते. आयसीआयसीआय होम फायनान्स संस्थेचे कार्यालय तिसऱ्या मजल्यावर असून कोणालाही न समजता अतिशय चतुराईने चोरट्याने हे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे.चोरट्याने तब्बल २२२ खातेधारकांचे पाच कोटींची दागिने लंपास केल्याची माहिती समोर येत आहे. लॉकर्स फोडून तब्बल पाच कोटींच्या दागिन्यांची चोरी झालीय.

मिळालेल्या माहितीनुसार लॉकर्सच्या चाव्या मध्ये ठेवण्यात आल्या होत्या, त्यामुळे पोलिसांना वेगळाच संशय येत आहे. विशेष म्हणजे चोरटे पीपीई किट घालून आले होते. सीसीटीव्हीची नजर असताना आणि पहारेकरांचा पहारा असतानाही चोरट्यांनी चोरीचे धाडस केले, याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सीसीटीव्हीच्या फुटेजमध्ये दरोडेखोरांचे चेहरे दिसत असून सरकार वाडा पोलिसांनी युद्ध पातळीवर तपास सुरू केला आहे.

## अशाप्रकारे अपप्रचार करणे अशोभनीय, खर्गे-भाजप नेत्यांची भेट, आंबेडकरांचा दावा, सचिन सावंतांचे प्रत्युत्तर

■ मुंबई: सचिन कदम

अखिल भारतीय काँग्रेस समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि भाजप नेत्यांची भेट झाली असल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी केल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, प्रकाश आंबेडकर यांचा हा दावा तथ्यहीन असल्याची टीका काँग्रेसचे महाराष्ट्राचे सरचिटणीस सचिन सावंत यांनी केला असून अशाप्रकारचे





अपप्रचार करणे अशोभनीय असल्याचे त्यांनी शनिवारी एक्सवरुन दिलेल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि भाजप नेत्यांची भेट झाली असल्याचा दावा केला. यामुळे देशाच्या राजकारणात नव्या चर्चेला सुरुवात झाली असून काँग्रेसने मात्र हा दावा फेटाळून लावला आहे. याप्रकरणी एक्सवरुन प्रतिक्रिया देताना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस सचिन सावंत म्हणाले की, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भाजपाच्या नेत्यांची भेट झाली असे म्हटले आहे, यात कोणतेही तथ्य नाही.

## आरक्षण हटविण्याचा पंतप्रधानांचा प्रयत्न; राहुल गांधी यांचा आरोप

■ हैदराबाद: वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आरक्षणाविरोधात आहेत. ॅ यांना आरक्षण हटवायचे आहे, असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निर्मल येथील प्रचारसभेत केला. अदिलाबाद लोकसभा मतदारसंघात हा भाग येतो. लोकसभा निवडणूक ही दोन विचारधारांमधील



लढाई असल्याचा दावा राहुल यांनी केला. घटनेचे संरक्षण करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे तर दुसरीकडे जनतेचे हक्क संपुष्टात आणण्याचा भाजप-संघाचा डाव आहे, असा आरोप राहुल यांनी केला. ५० टक्क्यांवरून आरक्षणाची मर्यादा वाढविणे हा देशापुढील मोठा मुद्दा आहे. काँग्रेसने याबाबत जाहीरनाम्यात आश्वासन दिल्याचे राहुल यांनी स्पष्ट केले. सरकारी कार्यालये तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कंत्राटी पद्धत आम्ही रद्द करू असे आश्वासन राहुल यांनी दिले. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा आम्ही हटवू असे पंतप्रधानांनी एकाही भाषणात म्हटले नाही असा दावा राहुल यांनी केला. पंतप्रधानांनी केवळ वीस ते २२ लोकांची १६ लाख कोटींची कर्जे माफ केली असा आरोप राहुल यांनी केला. तेलंगणमधील काँग्रेस सरकारने आपली आश्वासने पूर्ण केल्याचे त्यांनी नमूद केले. काँग्रेसच्या प्रस्तावित जातनिहाय जनगणनेने देशाचे राजकारण बदलून जाईल असे त्यांनी नमूद केले. अमेठी व रायबरेली या उत्तर प्रदेशातील दोन्ही मतदारसंघात काँग्रेसच्या प्रचाराची धुरा प्रियंका गांधी यांच्याकडे असेल. रायबरेलीतून राहुल गांधी तर अमेठीतून किशोरीलाल शर्मा हे उमेदवार आहेत. निवडणूक संपेपर्यंत प्रियंका या तेथेच थांबतील असे सूत्रांनी स्पष्ट केले. राहुल गांधी हे देशभर प्रचारात व्यग्र असल्याने गांधी कुटुंबाच्या या दोन्ही पारंपरिक मतदारसंघांत पक्षाची सारी भिस्त प्रियंकांवर असेल. या दोन्ही मतदारसंघांत २० मे रोजी मतदान आहे.

## अभिनेता गोविंदा प्रचारासाठी आला पण उमेदवाराचे नाव विसरला; त्याने लोकांना जिंकले पण...

■ पुणे: अभिजीत येरल्लू

लोकसभा निवडणुकीचा प्रचाराचा तिसरा टप्पा पूर्ण झाला. आता चौथ्या टप्प्यासाठी रणधुमाळी जोरात सुरु आहे. राजकीय नेते प्रचारसभांच्या धडका लावत आहेत. त्याचवेळी राजकीय पक्षांशी संबंधित सेलिब्रेटीज प्रचार सभा अन् रोड शो करत आहेत. बॉलीवूड अभिनेता गोविंदा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत काही महिन्यांपूर्वीच दाखल झाला. तो आता महायुतीच्या उमेदवारांसाठी निवडणूक प्रचार अन् रोड शो करत आहे. मावळ लोकसभा मतदार संघात गोविंदा महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी आला होतो. त्यावेळी तो आला, त्याने पाहिले अन त्याने जिंकलं हीष्ठ असे झाले. पण तो कोणाच्या प्रचारासाठी आला हेच विसरला. अखेर भाजप आमदार उमा खापरे यांना त्यांना श्रीरंग बारणे यांचे नाव सांगावे लागले.



महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या रोड शोसाठी गोविंदा रविवारी मावळ लोकसभेत आला होता. त्यावेळी पत्रकार परिषदेत गोविंदा उपस्थितांची नावं घेऊ लागला. पण ज्यांच्या रोड शो साठी तो आला, ते उमेदवार श्रीरंग बारणे त्यांच्या शेजारीच बसले होते. गोविंदा यांना त्यांचे नाव आठवत नव्हते. यामुळे अखेर भाजपच्या आमदार उमा खापरे यांना कानात त्यांचे नाव सांगावे लागले. गोविंदा यांना आमदार उमा खापरे कानात उमेदवाराचे नाव सांगत असतानाचे दृश्य माध्यमांच्या कॅमेरात कैद झाले. हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. आता उमेदवाराचे नाव लक्षात नसेल तर गोविंदाला बोलावून काय साध्य झालं? असा प्रश्न गोविंदाच्या उजव्या बाजूला बसलेल्या बारणे यांना नक्कीच पडला असेल. त्यांच्या चेहऱ्यावर तसाच काहीसा प्रश्न निर्माण झाल्याचं ही दिसून येत होतं.

## बंगालच्या बदनामीचे कारस्थान! संदेशखाली प्रकरणी तृणमूलचा भाजपवर आरोप

■ कोलकाता: वृत्तसंस्था

पश्चिम बंगालमधील संदेशखाली हिंसाचाराचा संपूर्ण घटनाक्रम म्हणजे लोकसभा निवडणुकांआधी राज्याला बदनाम करण्याचे भाजपचे कारस्थान होते असा आरोप राज्यातील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस पक्षाने केला आहे. तृणमूलने शनिवारी समाजमाध्यमावर एक ध्वनिचित्रफित प्रसिद्ध करून हा आरोप केला आहे. मात्र, 'पीटीआय'ने या ध्वनिचित्रफितीच्या सत्यतेची पडताळणी केलेली नाही. या ध्वनिचित्रफितीत एक व्यक्ती आपण संदेशखालीचे भाजप मंडल अधिकारी असल्याचे सांगत आहे. ''या संपूर्ण कारस्थानामागे पश्चिम बंगाल विधानसभेचे विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी'' असल्याचे तो इसम सांगत आहे. या व्यक्तीच्या सांगण्यानुसार, अधिकारी यांनी त्याला आणि त्या भागातील भाजपच्या अन्य नेत्यांना शाहजहान शेखसह तृणमूल काँग्रेसच्या तीन नेत्यांविरोधात बलात्काराचा आरोप करण्यासाठी तीन-चार स्थानिक महिलांना भडकावण्यासाठी सांगितले होते. पुढे हा कथित स्थानिक भाजप नेता असेही म्हणताना ऐकू येते की, अधिकारी यांनीच संदेशखालीमधील घरामध्ये



बंदुका ठेवल्या होत्या, त्या नंतर केंद्रीय यंत्रणांनी ताब्यात घेतल्याचे दाखवण्यात आले. तृणमूलने 'एक्स'वर 'संदेशखालीवर मोठा भांडाफोड' या मथळ्याखाली एक पोस्ट सामायिक केली आहे. अधिकारींनी बंगाल आणि संदेशखालीला बदनाम करण्यासाठी स्थानिक लोकांना पैसे देऊन सामूहिक बलात्काराचे खोटे कथन तयार केले असा आरोप तृणमूलने या पोस्टमध्ये केला आहे. ''बंगालच्या बदनामीसाठी भाजपने कोणतीही कसूर बाकी ठेवली नाही हे या ध्वनिचित्रफितीतून स्पष्ट होते. अन्य कोणी नाही तर सुवेंदू अधिकारी यांनी सामूहिक बलात्कार ते शस्त्रजप्ती, असा प्रत्येक दावा दावा केला आणि त्याचा बनाव रचला'', असा आरोप या पोस्टमध्ये करण्यात आला आहे. या प्रकरणी सुवेंदू अधिकारी यांची प्रतिक्रिया अद्याप कळू शकली नाही. तर, भाजपमध्ये किती खोलवर कीड आहे हे धक्कादायक संदेशखाली स्टिंगमधून दिसत आहे अशी टीका मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली.

## 'टेप रेकॉर्डरसारखे काम करू नका'; सर्वोच्च न्यायालयाचे न्यायालयांवर ताशेरे, सरकारी वकिलांबाबतही मांडली 'ही' भूमिका

■ नवी दिल्ली: प्रगती शर्मा

सर्वोच्च न्यायालयासमोर अनेक महत्वाच्या प्रकरणांची सुनावणी होत असते. सुनावणीनंतर न्यायालय अनेक महत्वाचे निर्णय देत असते. तसेच न्यायालयासमोर होणाऱ्या सुनावणीवेळी अनेक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले जात असतात. आता सर्वोच्च न्यायालयाने एका सुनावणीवेळी इतर न्यायालयांच्या कामकाजाबाबत भाष्य केले आहे. 'न्यायालयांनी फक्त टेप रेकॉर्डर सारखे काम करू नये', असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, 'न्यायालयांनी खटल्यांच्या सुनावणी वेळी सहभागाची भूमिका बजावली पाहिजे. तसेच साक्षीदारांच्या साक्ष नोंदवताना



फक्त टेप रेकॉर्डर म्हणून काम न करता फौजदारी खटल्यांच्या सुनावणीवेळी सरकारी वकील साक्षीदारांची कोणतीही प्रभावी आणि अर्थपूर्ण उलटतपासणी करत नाहीत. त्यामुळे न्यायाच्या हितासाठी न्यायाधीशांनी कार्यवाहीवर लक्ष ठेवले पाहिजे. तसेच सरकारी वकील जर एखाद्या प्रकरणासंदर्भात गाफील असतील तर न्यायालयाने कार्यवाहीवर प्रभावीपणे लक्ष ठेवले पाहिजे. असे केल्यास त्या प्रकरणाच्या सत्यापर्यंत पोहोचता येईल', असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

फौजदारी न्याय व्यवस्थेचा पाया म्हणून सार्वजनिक अभियोग सेवा आणि न्यायपालिका यांच्यातील संबंधांचे वर्णन करताना सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, सरकारी वकीलांच्या नियुक्तीमध्ये राजकीय विचाराचा घटक असता कामा नये. दरम्यान, १९९५ मध्ये पत्नीच्या हत्येप्रकरणी एका पुरुषाला दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली, या प्रकरणाचा निकाल देताना वरील निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. यावेळी या खंडपीठात न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचाही समावेश होता.

## 'पाकिस्तानने बांगड्या भरलेल्या नाहीत'. फारूख अब्दुल्ला यांचं वादग्रस्त विधान

■ दिल्ली: वृत्तसंस्था

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पाकव्याप्त काश्मीर भारतात सामील होण्याबाबत विधान केलं होतं. या विधानाला उत्तर देत असताना जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारूख अब्दुल्ला यांनी एक वादग्रस्त विधान केलं आहे. 'पाकिस्तानने हातात बांगड्या भरलेल्या नाहीत. त्यांच्याकडेही अणुबॉम्ब असून ते आपल्याविरोधात त्याचा वापर करू शकतात', असे फारूख अब्दुल्ला यांनी म्हटले. त्यानंतर त्यांच्या विधानावर जोरदार टीका होत आहे. एएनआय वृत्तसंस्थेशी बोलत असताना फारूख अब्दुल्ला म्हणाले की, जर संरक्षण मंत्र्यांना पीओके ताब्यात घ्यायचा असेल तर त्यांनी तो घ्यावा. आम्ही त्यांना रोखणारे कोण आहोत? मात्र त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी पाकिस्तानने हातात बांगड्या भरलेल्या नाहीत. त्यांच्याकडे अणुबॉम्ब आहे आणि दुर्दैवाने ते त्याचा आपल्या विरोधात वापर करू शकतात, असे ते म्हणाले. एप्रिल महिन्यात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी



भारतात होणाऱ्या विकासाचा दाखला देत म्हटले की, पाकव्याप्त काश्मीरमधील लोक स्वतःहून भारतात सामील होण्यासाठी पुढे येतील. 'पाकव्याप्त काश्मीर हा आमचा भाग होता आणि राहिल', असे विधान राजनाथ सिंह यांनी पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग येथील प्रचार सभेत बोलताना केले होते. भाजपाकडून याठिकाणी राजू बिस्ट निवडणूक लढवित आहेत. 'मला वाटतं की पीओके ताब्यात घेण्यासाठी भारताला काहीही करावं लागणार नाही. जम्मू आणि काश्मीरमध्ये ज्या प्रकारे ग्राउंड परिस्थिती बदलली आहे, ज्या प्रकारे या प्रदेशात आर्थिक प्रगती होत आहे आणि ज्या प्रकारे तेथे शांतता परत आली आहे, मला वाटतं की पीओकेच्या लोकांकडूनच भारतात विलीन होण्याच्या मागण्या पुढे येतील', असं ते म्हणाले. 'पीओके घेण्यासाठी आम्हाला बळाचा वापर करावा लागणार नाही कारण लोक म्हणतील की आम्हाला भारतात विलीन केलं पाहिजे. अशा मागण्या आता येत आहेत. पीओके आमचा होता, आहे आणि राहील', असं प्रतिपादन संरक्षणमंत्र्यांनी केले.